


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २३० * नांदेड * शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## नेपाळः मृतांचा आकडा ५९८ वर, १५०० जण अद्याप बेपत्ता

**काठमांडू (वृत्तसंस्था)–** आठवड्याच्या सुरुवातीला नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरामुळे मृतांची संख्या ५९८ वर पोहोचली आहे. शुक्रवारी नेपाळ पोलिसांनी या भीषण दुर्घटनेतील मृतांच्या अधिकृत आकड्यांना दुजोरा दिला. नेपाळ पोलिसांनी सांगितले की, 'भोटे कोशी-त्रिशूली कॉरिडॉर'च्या आसपासच्या भागात वाहून गेलेल्या किंवा अडकलेल्या शेकडो लोकांचा शोध घेण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे.

'नॅशनल डिझास्टर रिस्क रिडक्शन अँड मॅनेजमेंट ऑथॉरिटी'च्या (राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरण) ताज्या आकडेवारीनुसार, नेपाळमध्ये १५०० लोक बेपत्ता आहेत किंवा त्यांच्याशी संपर्क होऊ शकत नाही. या आकड्यामध्ये भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने (एमईए) केलेल्या मूल्यांकनाचाही समावेश आहे, त्यानुसार गुरुवारी उशिरापर्यंत २८८ भारतीय नागरिकांशी संपर्क होऊ शकला नव्हता. नेपाळने अद्याप राष्ट्रीयत्वानुसार मृतांची यादी जाहीर केलेली नाही, त्यामुळे मृतांमध्ये कोणत्याही भारतीयाचा समावेश



आहे की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.


सीमेपलीकडे तिबेटमध्ये, चिनी अधिकाऱ्यांनी गुरुवारी सकाळपर्यंत ५५८ लोक बेपत्ता असल्याची माहिती दिली. बीजिंगनेही देशनिहाय तपशीलवार आकडेवारी जाहीर केलेली नाही, त्यामुळे बेपत्ता लोकांच्या यादीत किती भारतीय किंवा इतर देशांचे नागरिक आहेत, हे स्पष्ट नाही. याव्यतिरिक्त सुमारे २०० भारतीय तिबेटमध्ये अडकले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, नेपाळमध्ये संपर्क होऊ न शकलेल्या २८८ भारतीय नागरिकांपैकी ७३ जण 'त्रिशूली-१' जलविद्युत प्रकल्पावर काम करणारे कर्मचारी आहेत.

बेपत्ता व्यक्तींमध्ये तिबेटमधील कैलास पर्वताकडे जाणारे किंवा तिथून परतणारे पर्यटक आणि यात्रेकरूंच्या गटांचा समावेश आहे. त्यापैकी अनेक जण तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि केरळमधील आहेत. गुरुवारपर्यंत दुपारी १ वाजेपर्यंत तामिळनाडूतील २१ पर्यटकांची सुरक्षित सुटका करण्यात आली होती आणि त्यांना काठमांडूला आणले जात होते. तिबेट भागात अडकलेल्या आणखी २०० भारतीयांनीही मदतीसाठी भारतीय अधिकाऱ्यांकडे स्वतंत्रपणे विनंती केली आहे.

नेपाळ पर्यटन मंडळाच्या यादीतील आकडेवारी काहीशी वेगळी माहिती देते, त्यानुसार १७८ भारतीय बेपत्ता किंवा संपर्काबाहेर असल्याचे नमूद केले आहे. ही तफावत निर्माण होण्याचे कारण म्हणजे भारताने जाहीर केलेल्या २८८ जणांच्या आकड्यामध्ये जलविद्युत प्रकल्पांवरील कामगार आणि नेपाळच्या पर्यटन नोंदणीमध्ये समाविष्ट नसलेल्या इतर गटांचाही समावेश आहे. नेपाळच्या पर्यटक यादीत भारतीयांचा गट सर्वात मोठा आहे. नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांनी सांगितले की, गुरुवारी ६९ विमानांच्या माध्यमातून ५७३ जणांची सुटका करण्यात आली. याव्यतिरिक्त, लष्कर आणि खासगी कंपन्यांची अतिरिक्त हेलिकॉप्टर्स सज्ज (स्टँडबाय) ठेवण्यात आली आहेत.

## मनोज जरांगे पाटील यांचे आजपासून अंतरवली सराटीत पुन्हा आंदोलन

**जालना (प्रतिनिधी)–** मनोज जरांगे पाटील आजपासून अंतरवली सराटीत शेवटचं आणि निर्णायक आंदोलन करणार आहेत. त्यासाठी अंतरवलीत मोठी तयारी सुरू आहे. अंतरवलीत घडामोडींना वेग आला आहे. दुसरीकडे जरांगे यांनी आंदोलन करू नये म्हणून सरकारनेही कंबर कसलेली आहे. पण जरांगे आपल्या निर्णयावर ठाम आहेत. शुक्रवारी संध्याकाळपर्यंत सरकारकडून ठोस काही निर्णय नाही घेतला गेल्यास जरांगे शनिवारपासून आंदोलन करणार आहेत.



दरम्यान, राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन वातावरण तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे आजपासून अंतरवाली सराटीत उपोषणाला सुरुवात करणार आहेत. या सर्व उपोषणाची तयारी झाली आहे. मोठ्या संख्येनं मराठी बांधव अंतरवाली सराटीच्या दिशेनं मार्गस्थ होताना दिसत आहेत. तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते देखील मनोज जरांगे पाटील यांची भेट घेम्यासाठी अंतरवाली सराटीत दाखल होत आहेत. शुक्रवारी काही राजकीय नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. दरम्यान, आता मागे हटणार नाही असा इशारा देखील मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. मराठा समाजाच्या ज्या नोंदी सापडल्या आहेत, त्यांना तात्काळ कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

आझाद मैदानावर सायंकाळी सहानंतर आंदोलन करता येणार नसल्याने आंदोलकांची कोंडी करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला. सरकारने दादागिरी करू नये. नाहीतर विमान सेवा, रेल्वेसेवा बंद करू. सर्वच दिशेने मराठे मुंबईत घुसतील. टप्प्याटप्प्याने मराठा बांधव मुंबईत येतील असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला. त्यामुळे अंतरवाली सराटीतील आंदोलन मुंबईत घेऊन जाण्याचाच इशारा त्यांनी दिला आहे.

दरम्यान जरांगे पाटील यांच्याशी आमची चर्चा सुरू असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. जरांगे यांच्यावर आंदोलनाची वेळ येणार नाही असे आंदोलनाच्या अवघ्या काही तास अगोदर त्यांनी दावा केला. ओबीसी आरक्षणावर परिणाम होणार नाही याची काळजी घेत असल्याचे ते म्हणाले. विखे पाटील, आपण, आमदार लाड हे जरांगे पाटील यांच्या संपर्कात आहेत आणि त्यांच्याशी चर्चा सुरू असल्याची माहिती सामंत यांनी दिली.

## महिला आरक्षण कायद्याबाबत पुन्हा हालचालींना वेग

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशात लवकरच महिला आरक्षण कायदा लवकर लागू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी संसद पुन्हा बोलावण्याचे संकेत दिले आहेत. त्यांच्या या वक्तव्यामुळे विरोधकांमध्येही अस्वस्थता वाढली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील महिलांना महिला आरक्षण कायदा लवकर लागू करण्याचे आश्वासन दिले असून, सरकार त्याच दिशेने काम करत असल्याचे रिजिजू यांनी सांगितले.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून परिसीमनाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली आहे. संसद विशेष अधिवेशन बोलावण्याचे संकेत देण्यापूर्वी सरकारने या विषयावर सर्वपक्षीय चर्चा घडवून आणावी, अशी मागणी खरगे यांनी केली. रिजिजू यांनी २०२९ पासून महिला आरक्षण कायदा लागू करण्यासाठी तसेच लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्के वाढ करण्यासंदर्भात घटनादुरुस्ती विधेयक आणण्यासाठी तातडीने अधिवेशन बोलावण्याबाबत स्पष्ट भूमिका मांडली नाही. मात्र, यापूर्वीही अधिवेशनाचे सत्रावसान न करता संसद पुन्हा बोलावण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

गेल्या १३ ऑगस्ट रोजी संपलेल्या पावसाळी अधिवेशनाचे अद्याप सत्रावसान झालेले नाही. याबाबत रिजिजू म्हणाले की, पंतप्रधानांनी देशातील महिलांना स्पष्टपणे आश्वासन दिले आहे की महिला आरक्षण आणि संसदेकडून महिलांना दिलेले वचन लागू केले जाईल. आम्ही त्याच आधारावर काम करत आहोत. रिजिजू यांच्या या वक्तव्याचा संबंध पावसाळी अधिवेशनाच्या सत्रावसानास होत असलेल्या विलंबाशी असल्याचे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटले आहे. पंतप्रधान मोदींना लिहिलेल्या पत्रात खरगे यांनी हा देशासाठी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असल्याचे नमूद केले.

तसेच, १६-१७ एप्रिल २०२६ प्रमाणे गोष्टी पुन्हा जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन त्यांनी केले. १६-१७ एप्रिलचा संदर्भ लोकसभेत झालेल्या विधेयकावरील चर्चा आणि मतदानाशी संबंधित आहे. खरगे यांनी स्पष्ट केले की, लोकसभेतील विद्यमान ५४३ जागा आणि त्यामध्ये राज्यांचा असलेला वाटा पुढील २५ वर्षांसाठी कायम ठेवण्यात यावा, अशी काँग्रेसची भूमिका आहे.

## महाराष्ट्रासह १३ राज्यांना पावसाचा अलर्ट

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील अनेक भागांमध्ये सध्या पावसाचा जोर पहायला मिळत आहे. दि. २९ ऑगस्टला रोजी महाराष्ट्रासह १३ राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

भारतीय हवामान विभागाकडून ओडिशात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. याशिवाय उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, झारखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील अनेक राज्यांमध्येही मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, ईशान्य उत्तर प्रदेश आणि लगतच्या परिसरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र पुढील २४ तासांत कमजोर होण्याची शक्यता आहे. मात्र, त्याच्या प्रभावामुळे अनेक भागांत पाऊस सुरूच राहू शकतो. दुसरीकडे, बंगालच्या उपसागराच्या उत्तरेकडे तयार झालेले चक्रीवादळसदृश वाऱ्यांचे क्षेत्र अद्याप सक्रिय आहे. त्याच्या प्रभावामुळे २९ ऑगस्टच्या आसपास उत्तर-पश्चिम बंगालचा उपसागर तसेच पश्चिम बंगाल आणि उत्तर ओडिशाच्या परिसरात आणखी एक कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेशात पुढील काही दिवस मान्सून सक्रिय राहण्याची शक्यता आहे. २९ ऑगस्ट रोजी राज्यातील काही भागांत पाऊस सुरू राहू शकतो. पश्चिम आणि पूर्व उत्तर प्रदेशात पावसाचा अंदाज आहे. पूर्व उत्तर प्रदेशात ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबरदरम्यान मुसळधार पावसाचा आणखी एक टप्पा पाहायला मिळू शकतो. १ ते ३ सप्टेंबरदरम्यान पूर्व उत्तर प्रदेशातील अनेक भागांत पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## कर्नाटकचे मंत्री बी. नागेंद्र यांचा राजीनामा

**बंगळूरू (प्रतिनिधी)–** कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या सरकारमधील कॅबिनेट मंत्री बी. नागेंद्र यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांचा नुकताच महिनाभरात शपथविधी पार पडला होता. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत त्यांना आपले पद सोडावे लागले आहे. बी. नागेंद्र हे कर्नाटकातील बेल्लारी ग्रामीणचे आमदार आहेत. ते राज्य सरकारमध्ये नियोजन आणि सांख्यिकी मंत्री होते. शुक्रवारी बंगळुरूमध्ये एका पत्रकार परिषदेत बी. नागेंद्र यांनी आपल्या मंत्रीपदाच्या राजीनाम्याची घोषणा केली.

## नांदेडमध्ये एटीएम मशीनमध्ये कार्ड बदलून वृद्धाचे २.२३ लाख रूपये लुबाडले

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरातील एका एटीएम मशीनवर कार्डची अदलाबदली करत एका वृद्धाला २.२३ लाख रूपये लुबाडल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.३० ते ९ वाजेच्या दरम्यान, वर्कशॉप कॉर्नर येथील एसबीआय एटीएम, नांदेड येथे ही घटना घडली. फिर्यादी सुदर्शन दशरथ ऐनलोड (वय ७२, रा. सम्राळा, ता. धर्माबाद) हे पैसे काढण्यासाठी गेले असता, तीन अनोळखी इसमांनी संगनमत करून त्यांना बोलण्यात गुंतवले आणि त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदल केली. त्यानंतर




वेगवेगळ्या एटीएममधून अनधिकृतपणे २ लाख २३ हजार रुपये काढून फसवणूक केली.

याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४७५/२०२६, कलम ३१८(४), ३१९(२), ३(५) बीएनएस-२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सपोनि महाजन हे करीत आहेत.

**भोकर येथे शेतकऱ्याचा मृत्यू**

दि. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास, महात्मा फुले नगर, भोकर येथील ४६ वर्षीय शेतकरी शुद्धोधन नागोराव गुंडेकर हे एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. शेतीतील नापिकी आणि बँकेच्या कर्जाच्या चिंतेतून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे माहितीवरून समोर आले आहे.

याबाबत माहिती देणारे नागोराव रामजी गुंडेकर (वय ७२, रा. महात्मा फुले नगर) यांनी दिलेल्या माहितीवरून भोकर पोलीस ठाण्यात आ.मृ. क्र. ४१/२०२६, कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ अन्वये नोंद करण्यात आली असून तपास सपोनि कांबळे हे करीत आहेत.


## राखीच्या धाग्याने बांधले सुरक्षेचे बंधन; शहर वाहतूक पोलिसांचा 'बी सेफ, ड्राईव्ह सेफ, रिच सेफ'चा मोलाचा संदेश

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** सण म्हणजे केवळ आनंद नव्हे, तर जबाबदारीची जाणीव! याच भावनेतून रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधत पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या संकल्पनेतून शहर वाहतूक शाखेने जनजागृतीचा एक अनोखा आणि मोलाचा उपक्रम राबविला. दंडुका उगारणाऱ्या हातांनी मायेच्या राखीचा धागा बांधत वाहनधारकांना सुरक्षिततेचे वचन दिले. यावेळी स्वतः वजिराबाद चौकात स्वतः पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांनी वाहनधारकांना राख्या बांधल्या.




शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक शाखेतील महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी दुचाकीस्वार, चारचाकी चालकांना थांबवून त्यांच्या मनगटावर राखी बांधली. ही केवळ राखी नव्हती, तर ती होती सुरक्षेची ग्वाही. राखी बांधतानाच महिला पोलिसांनी प्रत्येक वाहनधारकाला प्रेमळ पण ठाम शब्दात आवाहन केले. दादा, ही राखी म्हणजे तुमच्या बहिणीची तुमच्या सुरक्षिततेची प्रार्थना आहे. कृपया हेल्मेट घाला, सीटबेल्ट लावा, वेगावर नियंत्रण ठेवा आणि वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करा.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वाहनधारकांना बांधण्यात आलेल्या राख्यांवरच 'Be Safe, Drive Safe, Reach Safe' अर्थात **(पान ३ वर...)**




## जुन्या वैमनस्यातून तरुणाचा निर्घृण खून; आई-भाऊ जखमी

### भाग्यनगर पोलिसांकडून तिघांना जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील एकतानगर परिसरात जुन्या वादातून एका ३२ वर्षीय तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री उशिरा घडली. आकाश दवणे असे मृत तरुणाचे नाव असून, या हल्ल्यात त्याचा भाऊ महेश दवणे आणि आई सविता दवणे हे दोघेही जखमी झाले आहेत. या प्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी संशयित तिन मारेकऱ्यांना ताब्यात घेतले आहे.

आकाश दवणे आणि नितीन सावते गटामध्ये यापूर्वीपासूनच वर्चस्वावरून वाद होते. गुन्हेगारी वर्चस्वाच्या कारणातून दोन्ही गटांमध्ये अनेकदा वाद झाल्याची माहिती आहे. याच जुन्या वादातून गुरुवारी रात्री दोन्ही गट आमने- सामने आले आणि त्यांच्यात जोरदार हाणामारी झाली. प्राथमिक तपासानुसार, तीन ते चार जणांनी आकाश दवणे याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. गंभीर जखमी झाल्याने आकाशचा जागीच मृत्यू झाला. भांडण सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्याचा भाऊ महेश आणि आई सविता यांच्यावरही हल्ला करण्यात आल्याने ते दोघे जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी नितीन सावते, कुणाल सावते आणि साहिल दुधमल यांना ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले. घटनेतील पाच जण अद्याप फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, मयत आकाश दवणे हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या हत्येमागे गुन्हेगारी वर्चस्वाचा संघर्ष आणि पूर्वीचे वैमनस्य कारणीभूत आहे का? याचा तपास पोलीस करीत आहेत. या प्रकरणात ताब्यात घेतलेल्या सर्वांची चौकशी सुरू आहे. या खुनामुळे नांदेड शहरातील गुन्हेगारी पार्श्वभूमी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. रात्रीच घटनास्थळाला पोलीस अधीक्षक डॉक्टर निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्यासह आदी अधिकारी, कर्मचारी तसेच फॉरेन्सिक टीम सुद्धा घटनास्थळी दाखल झाली होती.

## नांदेडमध्ये रेल्वे विभागाच्या तपासणीत ९४३ 'फुकट्यां'वर कारवाई; ५.९७ लाखांची वसुली

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात दि. २७ ऑगस्ट रोजी तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत ९४३ फुकट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करत जवळपास ५.९७ लाखांचा दंड वसूली करण्यात आला आहे.

ही मोहीम सहाय्यक वाणिज्य अधिकारी शैलेश कुमार सिंह यांच्या देखरेखीखाली राबविण्यात आली. प्रवाशांनी अधिकृत तिकीटासह प्रवास करावा, विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालावा तसेच रेल्वेच्या महसुलाचे संरक्षण व योग्य महसूल प्राप्ती सुनिश्चित करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश होता.

या मोहिमेत ३१ तिकीट तपासणी कर्मचारी आणि ३ आरपीएफ कर्मचारी सहभागी झाले. यादरम्यान एकूण ३२ गाड्यांची तपासणी करण्यात आली.

तिकीट तपासणीदरम्यान एकूण ९४३ प्रकरणे आढळून आली असून, त्यातून ५ लाख ९७ हजार रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली. ही कामगिरी तिकीट तपासणी पथकांच्या सातत्यपूर्ण आणि समर्पित प्रयत्नांचे द्योतक आहे.

या कारवाईत विनातिकीट प्रवास प्रकरणे: ४९४ , - भाडे: १ लाख ५७ हजार २९५ रुपये दंड: २ लाख ५० हजार ५१५, अनियमित प्रवास प्रकरणे १६४, - भाडे: ५३ हजार ९८० रुपये, - दंड: ८२ हजार १४० रुपये, अन बुक्ड लगेज प्रकरणे: २८५, - ५३ हजार ७० रुपये रक्कम वसूल करण्यात आले. याशिवाय अनधिकृत फेरीविक्रीचे १ प्रकरण आढळून आले असून, त्यामध्ये २ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

मोहिमेदरम्यान धूम्रपान निर्माण करण्याचे कोणतेही प्रकरण आढळून आले नाही. नेहमी वैध तिकीट किंवा अधिकृत प्रवास दस्तऐवजासहच प्रवास करावा, असे आवाहन नांदेड मंडळ, दक्षिण मध्य रेल्वेतर्फे करण्यात आले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाला तडा!

सरकारी नोकरी मिळविण्यासाठी लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात. आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि प्रचंड स्पर्धा यांचा सामना करीत ते परीक्षेची तयारी करतात. अशा परिस्थितीत प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना घडल्या, तर प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणारी निराशा शब्दांत मांडणे कठीण आहे. परीक्षा रद्द करणे हा गैरप्रकारावर उपाय असू शकतो; मात्र त्यामुळे प्रामाणिक उमदवारांना झालेली मानसिक, आर्थिक आणि वेळेची हानी भरून निघत नाही. पण याचा विचार होत असल्याचे दिसत नाही. परीक्षा ही केवळ प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकेची प्रक्रिया नाही; ती गुणवत्तेला संधी देण्याची सामाजिक हमी आहे. ही हमीच जर संशयाच्या भोवऱ्यात सापडली, तर देशाच्या तरुण पिढीचा व्यवस्थेवरील विश्वास कोसळण्यास वेळ लागणार नाही. देशातील स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नीट-यूजी परीक्षेतील कथित गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट 'ब' औषध निरीक्षक भरती परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याचे प्रकरण समोर आले आहे. प्राथमिक पोलीस तपासात गैरप्रकार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ही संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे शेकडो उमेदवारांचे भवितव्य अधांतरी आले असले, तरी त्याहून गंभीर प्रश्न आहे तो म्हणजे राज्यातील आणि देशातील सार्वजनिक परीक्षा व्यवस्थेवरील तरुणांचा ढासळत चाललेला विश्वा१स. या प्रकरणात परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा उमेदवार आणि सार्वजनिक नेत्यांकडून करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल झाली आणि तपास पुढे सरकला. तपासादरम्यान एमपीएससी संबंधित काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली असून, प्रश्नपत्रिका खासगी कोचिंग संस्थेपर्यंत पोहोचल्याचा आरोप आहे. यापूर्वी देखील असे झाले आहे. **काही** उमेदवारांनी मोठ्या रकमांच्या मोबदल्यात प्रश्नपत्रिका मिळवल्याचेही तपास यंत्रणांचे म्हणणे आहे. या सर्व आरोपांची न्यायालयीन प्रक्रिया अद्याप बाकी आहे. त्यामुळे दोषींना कायद्याच्या चौकटीत शिक्षा होणे जितके आवश्यक आहे, तितकेच संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी होणेही गरजेचे आहे. महाराष्ट्रात प्रश्नपत्रिका फुटण्याची ही पहिलीच घटना नाही. शालेय बोर्ड परीक्षा, शिक्षक पात्रता परीक्षा तसेच विविध सरकारी भरती परीक्षांमध्ये यापूर्वीही गैरप्रकारांचे आरोप झाले आहेत. लोकसेवा आयोगासारख्या संस्थेबाबत मात्र विद्यार्थ्यांच्या मनात तुलनेने अधिक विश्वास होता. त्यामुळे या संस्थेच्या परीक्षेभोवती निर्माण झालेला संशय हा केवळ एका भरती प्रक्रियेपुरता मर्यादित नाही; तो संपूर्ण सार्वजनिक परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी संबंधित आहे. सर्वात मोठी चिंता खासगी कोचिंग उद्योग आणि परीक्षा व्यवस्थेतील संभाव्य संगनमताची आहे. स्पर्धा परीक्षांचा वाढता व्याप, सरकारी नोकऱ्यांची मर्यादित संख्या आणि कोचिंगच्या वाढत्या बाजारपेठेमुळे विद्यार्थ्यांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. काही ठिकाणी 'यशाची हमी' देणाऱ्या यंत्रणा उभ्या राहिल्या आहेत. त्यांची ही यशाची हमी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विश्वासावरच दिली जाते, हे वेगळे सांगणे न लगे. अशा वातावरणात प्रश्नपत्रिका फुटणे किंवा परीक्षेपूर्वी माहिती मिळविणे ही केवळ आर्थिक फसवणूक नसून, गुणवत्तेच्या आणि समान संधीच्या तत्त्वावरच घाला आहे. सरकारने सार्वजनिक परीक्षा गैरप्रकार रोखण्यासाठी कायदे करण्याबरोबरच त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला पाहिजे. कडक शिक्षा हा प्रतिबंधाचा एक भाग आहे; परंतु प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते छपाई, वाहतूक, सुरक्षित साठवणूक, परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोच आणि परीक्षा संपेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर तांत्रिक व प्रशासकीय सुरक्षा आवश्यक आहे. डिजिटल एन्क्रिप्शन, बहुस्तरीय प्रवेश नियंत्रण, स्वतंत्र ऑडिट आणि तात्काळ संशयास्पद हालचालींची नोंद करणारी यंत्रणा विकसित करावी लागेल. याचबरोबर लोकसेवा आयोगसारख्या संस्थांच्या अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेचाही स्वतंत्र आढावा घेण्याची वेळ आली आहे. त्या ठिकाणी देखील भ्रष्ट व्यक्तींनी उच्छाद मांडला आहे. अशांचा बंदोबस्त प्रथमत: करणे गरजेचे आहे. एखाद्या संस्थेतील काही व्यक्ती गैरप्रकारात सहभागी झाल्या असतील, तर त्याची जबाबदारी केवळ संबंधित व्यक्तींवर ढकलून संस्था मोकळी होऊ शकत नाही. प्रश्नपत्रिकेची सुरक्षा भेदलीच कशी, याचा शोध घेऊन भविष्यात अशी घटना घडणार नाही यासाठी संरचनात्मक बदल करणे आवश्यक आहे. सरकारने परीक्षा रद्द करून थांबता कामा नये. दोषी व्यक्तींवर काय कार्यवाही केली, हे ठळक प्रसिद्ध केले पाहिजे. प्रभावित उमेदवारांसाठी तातडीने पुनर्परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करणे, वयाची मर्यादा आणि अतिरिक्त संधींबाबत सहानुभूतीपूर्वक निर्णय घेणे, तसेच आर्थिक आणि मानसिक नुकसान लक्षात घेऊन योग्य दिलासा देण्याचा विचार करणे गरजेचे आहे. तरुणांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षांमध्ये कोणताही गैरप्रकार हा केवळ प्रशासनातील त्रुटी नसतो; तो सामाजिक न्यायावरचा आघात असतो. सरकारे येतात-जातात, परीक्षा मंडळांची रचना बदलते; पण विद्यार्थ्यांच्या मनातील विश्वास पुन्हा निर्माण करणे ही दीर्घकालीन जबाबदारी आहे. त्यात पुन्हा विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला टाकणारे प्रकार होत असतील तर लोकांची संयमशीलता किती दिवस टिकेल? त्यामुळे तात्पुरत्या उपायांऐवजी केंद्र आणि राज्य सरकारांनी तज्ज्ञ, विद्यार्थी, शिक्षक, परीक्षा संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रतिनिधींशी चर्चा करून देशव्यापी सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी परीक्षा व्यवस्था उभी करावी.

# राष्ट्रीय क्रीडा दिन: खेळातून घडणारे राष्ट्र

मानवी जीवनात खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. खेळ केवळ मनोरंजन नसून ते शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा भक्कम पाया होय . नियमित खेळण्यामुळे शरीर निरोगी राहते , मनुष्य ताजा तवाना दिसतो .खेळामुळे शिस्त, जिद्द, संघभावना यांसारख्या जीवनमूल्यांची जोपासना होते. नियमित खेळल्याने हाडे व स्नायू मजबूत होतात. स्टॅमिना वाढतो, शरीराची ऊर्जा, ताकद आणि लवचिकता सुधारते. खेळामुळे आजार दूर राहतात. लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. त्याचबरोबर मानसिक फायदे सुद्धा होतात. ताणतणाव कमी होतो. मन प्रसन्न राहते आणि नैराश्य दूर होते. तसेच विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते. अभ्यासात आणि कामात लक्ष केंद्रित करणे सोपे जाते .मुलांचा आत्मविश्वास वाढतो. यश आणि अपयश पचवण्याची मानसिक ताकद एकत्रित खेळल्याने सहकार्य आणि आपुलकी वाढते. संघटितपणे काम करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. खेळाडू व्यक्ती वेळेचे महत्त्व आणि नियमांचे पालन करतो . खेळ हा केवळ विजय-पराजयाचा विषय नसून, तो शिस्त, संघर्ष, आत्मविश्वास आणि राष्ट्राभिमान घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे.

भारतामध्ये दरवर्षी २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.राष्ट्रीय क्रीडा दिवस (राष्ट्रीय क्रीडा दिन) २०२६ ची थीम खेलेगा भारत, जीतेगा भारत आहे .दररोजच्या शारीरिक तंदुरुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी एक घंटा खेल के मैदान में (खेळाच्या मैदानात एक तास) या मोहिमेची अंमलबजावणी केली जात आहे . भारताचे महान हॉकीपटू आणि हॉकीचे जादूगार म्हणून जगभर प्रसिद्ध असलेले मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा केल्या जातो.देशासाठी त्यांनी क्रिडा क्षेत्रात दिलेल्या योगदानाची आठवण म्हणून हा दिवस साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिन हा केवळ एखाद्या महान खेळाडूचे स्मरण करण्याचा दिवस नाही, तर देशातील प्रत्येक नागरिकाने खेळाचे महत्त्व जाणून घेण्याचा आणि नव्या पिढीला क्रीडेकडे वळविण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.२०१२ पासून मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीचा दिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून घोषित करण्यात आला.देशात क्रीडा संस्कृती रुजवणे, तरुणांना खेळांकडे आकर्षित करणे आणि निरोगी जीवनशैलीसाठी शारीरिक हालचालींचे महत्त्व पटवून देणे हा याचा मूळ उद्देश .या दिवशी राष्ट्रपती भवनात देशातील उत्कृष्ट खेळाडूंना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार, आणि द्रोणाचार्य पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले जाते.



क्रीडा मंत्रालयामार्फत फिटनेस फिट इंडिया मोहीम आणि स्पर्धांचे आयोजन केले जाते, ज्याची थीम साधारणपणे 'एक घंटा, खेळ के मैदान अशी असते.

मेजर ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी झाला. अत्यंत साध्या परिस्थितीतून पुढे येत त्यांनी आपल्या विलक्षण प्रतिभेच्या जोरावर हॉकीच्या मैदानावर एक वेगळेच स्थान निर्माण केले. त्यांच्या हॉकी स्टिकवरील चेंडूवरील नियंत्रण इतके अफाट होते की, त्यांच्या खेळाकडे पाहणाऱ्यांना तो जणू काही जादूचा खेळ वाटत असे. म्हणूनच त्यांना प्रेमाने 'हॉकीचे जादूगार' असे संबोधले गेले. ध्यानचंद यांच्या कारकिर्दीचा सर्वांत गौरवशाली काळ भारतीय हॉकीच्या सुवर्णयुगाशी जोडलेला आहे. उत्तर प्रदेशमध्ये जन्मलेल्या ध्यानसिंग, 'हॉकीचे जादूगार', यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात ब्रिटिश इंडियन आर्मीच्या रेजिमेंटल टीममधून केली. ते चांदण्यांच्या प्रकाशात हॉकीचा सराव करत असे, म्हणून त्यांना 'चांद' हे प्रसिद्ध नाव दिले. त्यांचे असाधारण कौशल्य, सुपर कंट्रोल आणि चातुर्य यामुळे भारताला १९२८, १९३२ आणि १९३६ मध्ये सलग तीन ऑलिम्पिक सुवर्णपदके जिंकण्यात मदत झाली.१९३६ च्या बर्लिन ऑलिम्पिकमध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने अप्रतिम कामगिरी केली. त्यांच्या खेळाने केवळ भारतातीलच नव्हे, तर जगभरातील क्रीडाप्रेमींना प्रभावित केले. त्याच्या गोल-स्कोअरिंग कारनाम्यांच्या प्रभावामुळे भारत हॉकीमध्ये मास्टर बनले, भारत सरकारने १९५६ मध्ये ध्यानचंद यांना तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार, पद्मभूषण प्रदान केला. ध्यानचंद यांच्या खेळातील एक वैशिष्ट्य म्हणजे संघभावना. वैयक्तिक कौशल्य असतानाही त्यांनी संघाला केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या दृष्टीने स्वतःचा गौरव महत्त्वाचा नव्हता तर भारताचा विजय महत्त्वाचा होता. हीच भावना आजच्या खेळाडूंनी आणि विशेषतः नव्या पिढीने आत्मसात करण्याची गरज आहे.त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्यांनी ५७० हून अधिक गोल नोंदवले गेले आहेत.

आजच्या काळात भारता मध्ये क्रीडा क्षेत्राने प्रचंड यश मिळवले आहे जगात वेगवेगळ्या खेळात स्थान निर्माण केले आहे . भारतीय क्रीडा विश्वामध्ये विविध खेळांमध्ये जागतिक स्तरावर देशाचे नाव उंचावणारे अनेक यशस्वी आणि दिग्गज खेळाडू आहेत. क्रिकेट मध्ये कपिल देव,सचिन तेंडुलकर, महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली यांनी आपले नाव कोरले आहे.भारत अनेक वेळा या खेळात विश्वविजेता बनला आहे . त्याचबरोबर बॅडमिंटन मध्ये पी व्ही सिंधू, सायना नेहवाल यांनी स्वतःचं वर्चस्व निर्माण केले आहे. तर थलेटिक्स मध्ये नीरज चोपडा, पी टी उषा, मिल्खा सिंग यांनी आपल्या देशाचा झेंडा गाढला आहे. मेरी कोम, दिनेश फोगाट, बबीता फोगाट यांनी कुस्तीमध्ये आपले वर्चस्व गाजवलेले आहे .याचबरोबर लिएंडर पेस , सानिया मिर्झा , विश्वनाथन आनंद , डी मुकेश, दिव्या देशमुख, अभिनव बिंद्रा इत्यादी महान खेळाडूंनी भारताचा नावलौकिक वाढवलेला आहे. क्रिकेट , हॉकी, फुटबॉल, कबड्डी, कुस्ती, बॅडमिंटन, टेनिस, अथलेटिक्स, नेमबाजी, जलतरण, बुद्धिबळ अशा अनेक खेळांमध्ये भारतीय खेळाडू देशाचे नाव उज्ज्वल करीत आहेत. ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा तसेच विविध जागतिक स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंची कामगिरी सातत्याने उंचावत आहे. त्यामुळे भारतामध्ये क्रीडा संस्कृती रुजत असल्याचे चित्र दिसत आहे.परंतु अजूनही आपल्यासमोर काही आव्हाने आहेत. अनेक ठिकाणी मुलांच्या हातात खेळाचे साहित्य देण्याऐवजी त्यांच्यावर केवळ शैक्षणिक गुणांचे ओझे टाकले जाते. खेळामुळे अभ्यासाचे नुकसान होते अशी चुकीची समजूत आजही काही पालकांच्या मनात आहे. प्रत्यक्षात खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वेळेचे नियोजन, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, सहकार्याची भावना आणि आत्मविश्वास निर्माण होतो. त्यांशी एकाग्रता , स्मरणशक्ती वाढते .पराभव स्वीकारण्याची आणि पुन्हा नव्या जोमाने उभे राहण्याची ताकदही खेळच शिकवतो. आज मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया आणि डिजिटल मनोरंजनामुळे मुलांचा मैदानी खेळाकडे असलेला ओढा कमी होत आहे. मुले तासन्तास मोबाईलवर खेळात आहेत . मोबाईलवर राहण्या ऐवजी मुलांनी मैदानावर घाम गाळणे आवश्यक आहे. शरीर निरोगी असेल तर मनही प्रसन्न राहते आणि अभ्यास करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे खेळा आणि निरोगी राहा हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने शाळा आणि महाविद्यालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. प्रत्येक विद्यार्थ्याला किमान एका खेळाची आवड निर्माण व्हावी, यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील गुणवंत खेळाडूंना योग्य प्रशिक्षण, मैदान, प्रशिक्षक आणि क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे. भारतातील खऱ्या अर्थाने क्रीडा प्रतिभा ही केवळ मोठ्या शहरांमध्ये नसून गावागावांत दडलेली आहे.मेजर ध्यानचंद यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते ,प्रतिभेला मेहनतीची जोड मिळाली तर अशक्य वाटणारे ध्येयही साध्य करता येते. त्यांनी प्रसिद्धीच्या मागे धावण्यापेक्षा आपल्या खेळावर प्रेम केले. सातत्यपूर्ण सराव, शिस्त, समर्पण आणि देशासाठी खेळण्याची भावना यामुळे ते भारतीय क्रीडा क्षेत्रातील अमर व्यक्तिमत्त्व ठरले.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा पुरस्कार, पदके आणि विक्रम यापलीकडील विचार करण्याची संधी आहे. प्रत्येक घरात खेळाला स्थान मिळाले, प्रत्येक शाळेत उत्तम मैदान उपलब्ध झाले, प्रत्येक मुलाला खेळण्याची संधी मिळाली आणि प्रत्येक पालकाने आपल्या मुलाच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन दिले, तर भारत निश्चितच क्रीडा महासत्ता बनू शकतो.आज देशाला केवळ डॉक्टर, अभियंते, प्रशासक आणि वैज्ञानिकांचीच गरज नाही.तर, उत्कृष्ट खेळाडूंचीही गरज आहे. मैदानावर भारताचा तिरंगा उंचावणारा प्रत्येक खेळाडू हा देशाचा अभिमान असतो. त्याच्या विजयामागे केवळ त्याची मेहनत नसते, तर त्याच्या कुटुंबाचा त्याग, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि संपूर्ण देशाच्या शुभेच्छा असतात.राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आपण एक संकल्प करूया,प्रत्येक मुलाला खेळू देऊ, प्रत्येक प्रतिभेला संधी देऊ आणि खेळाला शिक्षणाइतकेच महत्त्व देऊ.

मेजर ध्यानचंद यांचे जीवन आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे. त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली म्हणजे केवळ त्यांची जयंती साजरी करणे नव्हे, तर त्यांच्या शिस्तीचा, समर्पणाचा आणि राष्ट्रप्रेमाचा आदर्श आपल्या जीवनात उतरविणे होय.निरोगी शरीर, प्रसन्न मन, शिस्तबद्ध जीवन आणि जिंकण्याची जिद्द यातूनच सक्षम नागरिक आणि सशक्त राष्ट्र घडते. म्हणूनच राष्ट्रीय क्रीडा दिनाचा संदेश आहे,मैदान गाजवा, आरोग्य जपा, जिद्द वाढवा आणि भारताचा तिरंगा जगाच्या क्रीडांगणावर सदैव उंच फडकवा सर्वांना क्रिडा दिनाच्या खुप खूप शुभेच्छा.

**-प्रा. डॉ. विजय भोसले,**
रसायनशास्त्र विभाग,
यशवंत महाविद्यालय, नांदेड.
मो.क्र.९४०३०६७२५२

# हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद



आजचा दिवस भारतीय क्रीडा इतिहासात अत्यंत महत्त्वाचा आहे. हॉकीचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे मेजर ध्यानचंद यांची जयंती आपण राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात येते. त्यांच्या अप्रतिम खेळकौशल्याने भारतीय हॉकीला सुवर्णयुग प्राप्त करून दिले. ऑलिंपिकमध्ये सलग विजय मिळवत भारताचा तिरंगा उंचावला आणि भारताला जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून दिले.

मेजर ध्यानचंद हे फक्त एक खेळाडू नव्हते, तर खेळाडूवृत्ती, शिस्त, संयम आणि क्रीडाभावनेचे सजीव उदाहरण होते. त्यांचा खेळ पाहून जगातील नामांकित खेळाडू थक्क झाले होते. आजही त्यांचे नाव घेतले की प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमानाची भावना जागृत होते.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, क्रीडा ही फक्त स्पर्धा नाही, तर ती आरोग्य, संघभावना, परिश्रम आणि राष्ट्रभक्ती यांची शिदोरी आहे. भारतातील युवा पिढीने मेजर ध्यानचंद यांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन प्रत्येक खेळाच्या माध्यमातून देशाचे नाव उज्ज्वल करावे.

भारताचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी अलाहाबाद येथे झाला. २९ ऑगस्ट हा दिवस भारतामध्ये राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून साजरा केला जातो. मेजर ध्यानचंद यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत १००० पेक्षा जास्त गोल केले. भारताचे महान खेळाडू हॉकीचे जादूगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ध्यानचंद यांचे कर्तृत्व खेळातील कामगिरी पाहता त्याने भारतीय हॉकीला जगात जागतिक कीर्ती मिळवून दिली. ऑलम्पिक स्पर्धेत हॉकी खेळत असताना भारतीय संघाने जर्मनीला लागोपाठ तीन (१९२८ अ मस्टरडॅम, १९३२ लॉन्स एंजलिस, आणि १९३६ बर्लिन) ऑलिंपिक मध्ये सुवर्णपदक मिळविली होती. या स्पर्धेत भारताने अंतिम सामन्यात यजमान संघाचा ८-१ असा प्रभाव केला होता. तो दिवस १५ ऑगस्ट होता. १२ वर्षानंतर त्याच दिवशी भारत स्वतंत्र झाला. हा आश्चर्यकारक योगायोग आहे. या सामन्यात जर्मनीने गोल्ड जिंकावे व आपल्या देशाची मान उंचवावी म्हणून जर्मनीचे राष्ट्राध्यक्ष हिटलर तेथे उपस्थित होता. कारण जर्मनी व भारत फायनल मॅच होती.

भारत हा सामना हरावा म्हणून जर्मनीने खूप प्रयत्न केले. एवढेच नाही तर जर्मनीच्या फिल्ड स्टाफने आपल्या प्रशासनाच्या सांगण्यावरून एक निर्णय घेतला होता. मैदानाला गरजेपेक्षा जास्त ओले केले होते. भारतीय खेळाडूंचे शूज हलक्या प्रतीचे असल्याने ते घसरून पडतील असा त्यांचा गैरसमज होता, परंतु मेजर ध्यानचंद यांनी परिस्थिती ओळखली व त्याने एक धाडसी निर्णय घेतला व स्वतःच्या पायाचे शूज काढून टाकले आणि मोकळ्या पायाने सामना खेळला. भारताला चार एकने सामना जिंकून दिला.

मेजर ध्यानचंद यांचा खेळ बघून हिटलर चकीत झाला. हा सामना संपण्याआधी काही मिनिटे अगोदर हिटलर तावातावाने तेथून निघून गेला. कारण स्टेडियमच्या आत आणि बाहेरसुद्धा जर्मनीचे लोकं सामना पाहण्यासाठी आले होते, परंतु भारताने हा सामना जिंकला व ऑलेंपिक गोल्ड मेडल जिंकले. तेथील सर्व वातावरण शांत तर भारतामध्ये दिवाळी साजरी करण्यात आली. सामना संपल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मेजर ध्यानचंद यांना हिटलरने आपल्या ऑफिसमध्ये बोलावले आणि त्यांना अनेक आमिषं दाखवली.

ध्यानचंद यांना पायाकडे बोट दाखवून म्हणाले, तुमची गरिबी मी दूर करतो. जर्मन सैन्यात मोठे अधिकारी, भरपूर पगार, मोठा बंगला, गाडी, जमीन, देतो, तुम्ही यानंतर आमच्या जर्मनी देशाकडून खेळा. प्रचंड स्वाभिमानी आणि प्रचंड देशभक्त असलेले मेजर ध्यानचंद यांनी त्यांना कडव्या शब्दात सरळ स्पष्ट नकार दिला. मेजर ध्यानचंद यांच्या खेळावर जादू होतीच, पण त्यांच्या कडव्या देशभक्तीसाठी आपल्याकडून त्यांना मानाचा मुजरा. याच फायनल मॅच दरम्यान जर्मनीच्या खेळाडूने खेळ चालू असताना ध्यानचंद यांच्या हॉकी टिकणे तोंडावर मारून एक दात तोडला तरी ते खेळले. याच सामन्यात त्यांचा खेळ बघून त्यांची हॉकी स्टिक तोडून तपासण्यात आली तरीसुद्धा त्यांच्या खेळावर काही परिणाम झाला नाही. या ऑलम्पिक स्पर्धेत ते भारतीय कर्णधार होते.

हॉकीच भारताने एकूण आठ सुवर्णपदके मिळविली आणि ज्या पद्धतीने घराघरांत क्रिकेट खेळले जाते त्याच पद्धतीने मेजर ध्यानचंद यांच्या काळात भारतात हॉकी खेळली जात होती, परंतु १९८० नंतरच्या ऑलिंपिक स्पर्धेनंतर हॉकीला जी घसरण लागली तिच्यामुळे लोकाचे या खेळाकडे दुर्लक्ष झाले. खेळ कोणताही असो, एखादा राष्ट्रीय स्पर्धेत मेजर ध्यानचंद यांचे नाव देण्यात यावे. उदाहरणार्थ क्रिकेटमध्ये रणजी करंडक तेव्हा कुठे ध्यानचंद यांचे क्रीडा कामगिरी प्रत्येक वेगवेगळ्या खेळातील खेळाडूला कळेल. खेळात चांगले प्रदर्शन करून विद्यार्थी २००८ ते २००९ नंतर मेजर ध्यानचंद यांनी खेळातील कामगिरी पाहता त्यांना भारतरत्न देण्याची मागणी सतत करण्यात येत असते. मेजर ध्यानचंद यांच्या नावाने जिल्ह्यात मोठी स्पर्धा घेणे प्राथमिक स्तरावर स्कूल ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा घेऊन क्रीडाचे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. मेजर ध्यानचंद यांचे क्रीडा या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सर्वांना क्रीडा संस्कृती जोपासण्याचा, तंदुरुस्त राहण्याचा आणि खेळाच्या माध्यमातून एकात्म भारत घडवण्याचा संकल्प करूया!


मेजर ध्यानचंद यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**-प्रा. डॉ. रमेश नांदेडकर**
पर्यवेक्षक तथा क्रीडाशिक्षक
इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालय
सिडको नवीन नांदेड

# संघर्षातून सिद्धीकडे

जीवन जगत असताना आपण पाहतो,कधी अस वाटत आता सर्व मार्ग बंद झालेत आणि आपण हताश होतो व नकारात्मक भूमिका मनावर हावी होऊन पुढे पाहणच बंद करतो.अनेकांनी ह्या स्थितीचा अनुभव जीवनात एकदा तरी घेतला असेलच.जीवन हे संघर्षाने उज्वल बनते हे काही नवीन नाही प्रत्येकजण जीवन जगण्यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न करत राहतो ज्यामध्ये उपजीविका भागवण्यासाठी विविध प्रकारची कामे असतील कुणी नोकरी तर कुणी व्यवसाय प्रत्येक क्षेत्रात संघर्ष आहेच.शिक्षण,आकलनशक्ती,चातुर्य, समज आणि बुद्धिमत्ता जरूर सर्वांच्या वेगवेगळया असतील परंतु जगण्याची जिद्द सर्वांची सारखी असते व यासाठी मनुष्य अविरत प्रयत्न करत राहतो.पशू ,पक्षी आणि जीवजंतू हे सुद्धा जगतच असतात मग त्यांचा उदरनिर्वाह कोण चालवतो कारण ते तर माणसा सारखे काहीच काम,व्यवसाय करत नाहीत. ईश्वराने जन्म दिला आहे तेंव्हा त्याची काळजी सुद्धा तो करणारच.पृथ्वीतलावर केवळ मनुष्य धडपडत राहतो आणि जीवनाबद्दल कायम उदासीन सुद्धा राहतो.

आपण मोठ-मोठ्या व्यक्तीबद्दल अभ्यास केला तर एक गोष्ट प्रखरतेने लक्षात येईल की कुणाचेच जीवन हे सुखकर नव्हते सर्वांनी आकंठ संघर्षातून जीवन घडवले आहे.हलाखीच्या परिस्थितीत दिवस



काढून त्यांनी ते साध्य करून दाखवलं जे इतर लोकांना अशक्य वाटत असे.अखंड स्वराज्याची स्थापना केवळ संकल्पना होती परंतु शिवकालीन इतिहास पाहिला तर बोटावर मोजण्या इतक्या मावळ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वात हीच संकल्पना साध्य करून दाखवली,विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणासाठी अहोरात्र मेहनत घेतली व त्या शिक्षणाच्या ताकतीने संविधान निर्मिती करून मोलाचे योगदान दिले.भारत सुध्दा एक दिवसात स्वतंत्र झाला नसून त्यात अनेक थोर लढवय्या स्वातंत्र्यसैनिकांचा प्रबळ इच्छाशक्तीचा वाटा आहे.नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे अदम्य साहस,लोकमान्य टिळकांची संघटन शक्ती,सावित्री बाई फुले यांनी महिलांसाठी शिकण्याची मुहूर्तमेढ रोवली तर भगतसिंग यांनी अगदी पोर वयात बलिदान दिले व हे सर्व करू शकले कारण त्यांनी नकारात्मक भावनेला जीवनात थारा दिला नाही.

एक एक धागा जोडून सुंदर वस्त्र निर्मिती होते.एक एक विट रचून इमारती बांधल्या जातात.पक्षी एक एक गवताची काडी जमा करून घरटे तयार करतात म्हणून कुठेतरी छोटीसी सुरुवात केल्यानंतरच मोठं मोठी ध्येय साध्य होऊ शकतात. एक छोटी ठिणगी संपूर्ण जंगल उध्वस्त करण्याचं सामर्थ्य ठेवते आणि हीच ठिणगी जर मनात एक जिद्द पेटवण्यासाठी पडली तर माणसासाठी काहीच अशक्त राहत नाही.झाडावर चढताना साधी मुंगी सुध्दा हजारदा पडते परंतु जिद्दीने पुन्हा एकदा प्रयत्न करतेच.माणसाने मधाची पोळी काढून घेतली म्हणून मधमाशी कधी मधसंचयाचे काम सोडत नाही मग जर हे करू शकतात तर माणूस बलशाली,बुद्धीशाली असून का खचून जातो.एक शारीरिक विकलांग भिक मागताना दिसतो तर कुठेतरी असाच एक विकलांग काम करताना पण आपण पाहतो मग विकलांगता ही शारीरिक अपंगत्वाचे कारण नसून मानसिक अपंगत्वाचे आहे हे सिद्ध होते.नकळतपणे फेकलेले बी रुजते तर खडकातून वर मान काढत सुंदर रोपटे जन्म घेऊ शकते कारण मनाची तयारी भक्कम असेल तर सुरुवात कुठूनही करता येते.

संघर्षमय जीवन जगासाठी उदाहरण बनून जाते.लढाई न करता हार मानन्यापेक्षा लढत मरणे कधीही उत्तम.

**-पवन श्रीरंगसा कुसुंदल**
नंदीग्राम सोसायटी,नांदेड
मो. ९०७५५९५६९५

# शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नांवर आ. आनंद पाटील बोंढारकर यांची आढावा बैठक

## नवीन पाईपलाईनचे काम वेळेत पूर्ण करून शेतकऱ्यांनश पाणीपुरवठा करण्याचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड दक्षिण मतदारसंघातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी विष्णुपुरी प्रकल्पासह विविध ठिकाणच्या जलसिंचन व्यवस्थेचा आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी आढावा घेतला. नांदेड विश्रामगृह येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली.



बैठकीत विष्णुपुरी येथून मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच रस्ते, कॅनॉल, तलाव, पाईपलाइन आणि सिंचनाशी संबंधित विविध कामांचा आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या नवीन कामांचे प्रस्ताव तयार करून ते शासन दरबारी सादर करण्याचे निर्देश आमदार बोंढारकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

नवीन पाईपलाइनचे काम कोणत्याही कारणाने प्रलंबित न ठेवता ते वेळेत पूर्ण करावे आणि त्याद्वारे शेतकऱ्यांना आवश्यक पाणीपुरवठा सुरू करावा, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या. मतदारसंघातील सिंचन व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

बैठकीस अधीक्षक अभियंता आय. एम. चिश्ती, अधीक्षक अभियंता प्रशांत देशमाने, कार्यकारी अभियंता डी. एस. बागुल, सी. आर. बनसोड, सावंत, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, तालुका प्रमुख अशोक मोरे, श्याम पाटील वानखेडे, राज हंबर्डे, प्रभाकर आढाव, उपअभियंता अंकुलवार, अरुम, भुक्तरे, सहायक अभियंता बागवान, चंचलवाड, ससाणे आदी उपस्थित होते.

# गोर बंजारा तीज उत्सवात बंजारा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे –डॉ. निकिता चव्हाण



नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड येथे गोर बंजारा तीज महोत्सवाचे आयोजन दि. २७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०२६ दरम्यान करण्यात आले आहे.

तीज महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये लहान मुलांचे नृत्य, पारंपरिक गणवेश स्पर्धा, मिस बंजारा स्पर्धा, बंजारा ऑर्केस्ट्रा, यावर्षाची ढंबोळी (पूजा) दि. ४ सप्टेंबर रोजी सायं. ७ वाजा पार पडणार असून, या पूजेसाठी दीक्षा गुरू प्रेमसिंग महाराज उपस्थित राहणार आहेत. सत्कार मूर्ती म्हणून रामेश्वर नाईक (मुख्यमंत्री सन्मान निधी प्रमुख), आ. डॉ. तुषार राठोड, महंत जितेंद्र महाराज, ॲड. मोहिनी इंद्रनिल नाईक (नगराध्यक्षा पुसद), संजय राठोड यांच्या धर्मपत्नी सौ. शितल राठोड, आ. ॲड. श्रीजया अशोकराव चव्हाण, सौ. पूजा रामेश्वर नाईक, महापौर कविता मुळे, सौ. राजश्री हेमंत पाटील, श्रीमती बेबी प्रदीप नाईक, सौ. संध्या बालाजी कल्याणकर, सौ. प्रणिता देवरे-चिखलीकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दि.५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील व समस्त परिसरातील समाजबांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तीज समिती अध्यक्षा सौ. निकीता बी. चव्हाण, सुनिल राठोड (नायक), सौ. माला पवार, सौ. देवका राठोड, सौ. सीमा राठोड, सौ. श्रध्दा चव्हाण, सौ. पुष्पा राठोड, सौ. वर्षा चव्हाण, सौ. अनिता राठोड, सौ. गीता राठोड, सौ. सविता चव्हाण, सौ. लक्ष्मी राठोड, सौ.जाधव, सौ. शिल्पा चव्हाण, सौ. यशोदा राठोड, सौ. शोभाराणी चव्हाण, सौ. निताबाई राठोड, सौ. नंदा राठोड, सौ. स्मिता पवार, सौ. शांता चव्हाण, सौ. मीनाक्षी जाधव, सौ.सुरेखा राठोड, सौ. सुरेखा जाधव व समस्त तीज महोत्सव समिती नांदेड यांनी केले आहे.

# प्रसिद्ध कवयित्री गुंजन पाटील यांच्या बहारदार कविता आणि कृषी शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन

## आयोजक भागवत देवसरकर यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त हदगाव येथे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन व बहारदार कवितांचा पर्वणी असणाऱ्या भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२:३० वा. सुमन गार्डन मंगल कार्यालय, हदगाव येथे हा भव्य शेतकरी मेळावा व कृतज्ञता सोहळा होणार आहे. या मेळाव्यात दोन प्रमुख आकर्षणे असणार आहेत.



**बहारदार काव्य मैफील :** महाराष्ट्राची लोकप्रिय कवयित्री गुंजन पाटील या शेतकऱ्यांच्या जीवनावर, ग्रामीण वास्तवावर आणि शेतीच्या प्रश्नांवर आपल्या मिश्किल आणि विनोदी शैलीत बहारदार कविता सादर करणार आहेत. त्यांच्या कवितेतून शेतकऱ्याचे जगणे, त्याचे कष्ट आणि त्याचा आनंद उलगडणार आहे.

**शास्त्रज्ञांचे थेट मार्गदर्शन :** सध्या कापूस, सोयाबीन आणि हळद पिकावर आलेल्या विविध कीड व रोगांमुळे शेतकरी चिंतेत आहे. यावर उपाय म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ या मेळाव्यात शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन करणार आहेत. पिकांवरील बोंडअळी, खोडकिडा, पिवळा मोझॅक आणि करपा रोगावरील नियंत्रण, उसावरील पांढरी माशी यावर उपाययोजना सविस्तर माहिती दिली जाणार आहे, याशिवाय महायुती सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेबद्दल सरकारप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, जिल्ह्यातील आमदार, खासदार, लोकप्रतिनिधील, विविध पक्षाचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शेतीसाठी उपयुक्त मार्गदर्शन आणि बहारदार कवितांचा कार्यक्रम दुहेरी संगम असणाऱ्या मेळाव्यास सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक भागवत देवसरकर यांनी केले आहे.

# नांदेडमध्ये पैशाच्या वादातून तर पांगरा येथे जुन्या भांडणातून खुनी हल्ला

## विमानतळ आणि लोहा पोलीस ठाण्यात ६ जणांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात खुनाच्या प्रयत्नाच्या दोन वेगवेगळ्या घटना घडल्या असून, पोलिसांनी दोन्ही प्रकरणी विमानतळ आणि लोहा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास नुरी चौक, इस्लामपुरा, नांदेड येथे पैशाच्या देवाण-घेवाणीच्या कारणावरून वाद झाला. यातील आरोपी शेख रेहान उर्फ खडक (वय १९), शेख सोहेल उर्फ सोनू शेख बबलू (वय २२) व अब्दुल माजिद उर्फ सोनू (वय २६, तिन्ही रा. नुरी चौक, नांदेड) यांनी संगनमत करून फिर्यादीस जीवे मारण्याच्या उद्देशाने खंजरने मारहाण करून गंभीर जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेल्या एका पोलिसांच्या सांगण्यावरूनच मारहाण केल्याचे जखमीचा व्हीडीओ व्हायरल झाला. या कर्मचाऱ्यावर आता काय कारवाई होणार हे येणारा काळच ठरवेल.

याप्रकरणी फिर्यादी अब्दुल सत्तार अब्दुल गफार (वय ४०, रा. नुरी चौक, इस्लामपुरा) यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४०७/२०२६, कलम १०९, ११८(२), ३५२(२), ३५१(३), ३(५) BNS-२०२३ सह कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून, अधिक तपास पोउपनि साखरे करीत आहेत.

दि. २४ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास पांगरा, ता. कंधार येथे जुन्या भांडणाच्या कारणावरून वाद झाला. यातील आरोपी भैय्यासाहेब रमेश सूर्यवंशी, मुन्ना पांडू सूर्यवंशी (दोघे रा. पांगरा, ता. कंधार) व अक्षय वाघमारे (रा. दापशेड) यांनी संगनमत करून फिर्यादीच्या पतीस जीवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड व काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली.

# किनवटमध्ये तंबाखूजन्य पदार्थ निर्मितीचा अड्डा उद्ध्वस्त

**किनवट (प्रतिनिधी)–** परिसरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची निर्मिती आणि साठवणूक करणाऱ्या ठिकाणावर मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी छापा टाकून पोलिसांनी एकूण १ लाख ३ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

फुलेनगर, किनवट येथील रहिवासी नामदेव नागजुरवार हा आपल्या राहत्या घरात महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला गुटखा आणि तत्सम तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर निर्मिती करीत आहे, अशी गोपनीय माहिती किनवट पोलिसांना मंगळवारी सकाळी मिळाली. त्यावरून पोलीस पथकाने पंचांसमक्ष सदर ठिकाणी छापा टाकला. घराच्या तपासणीदरम्यान सुगंधित तंबाखूजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य आणि पदार्थ आढळून आले.

# मुक्या जीवांसाठी अनोखा रक्षाबंधन; उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनकडून भटक्या जनावरांना 'रिफ्लेक्टिव्ह सेफ्टी बेल्ट'

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रेम आणि संरक्षणाचा सण असलेल्या रक्षाबंधनाचे औचित्य साधून शहरातील संवेदनशील संस्था उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनने एक अनोखा आणि स्तुत्य उपक्रम राबविला आहे. मानवी नात्यांच्या पलीकडे जात मुक्या प्राण्यांच्या रक्षणासाठी शहरातील शेकडो भटक्या जनावरांना आणि कुत्र्यांना रिफ्लेक्टिव्ह सेफ्टी बेल्ट लावण्यात आले आहेत.



सध्या रात्रीच्या वेळी शहरात मोकाट गाई, म्हशी, बैल आणि भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर असतो. अंधारामुळे वाहनचालकांना ही जनावरे वेळेवर न दिसल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यात अनेकदा मुक्या प्राण्यांचा नाहक बळी जातो, तर वाहनचालकही जखमी होतात.

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून फाउंडेशनने रात्रीच्या वेळी वाहनांच्या प्रकाशात चमकणारे विशेष रिफ्लेक्टिव्ह सेफ्टी बेल्ट जनावरांना घालण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे वाहनचालकांना दूरवरूनच जनावरे असल्याची जाणीव होईल आणि अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल.

या लोकोपयोगी अभियानाचा शुभारंभ शहरात उत्साहात करण्यात आला. या मोहिमेदरम्यान देगलूर नाका परिसरातील पशुवैद्यकीय हॉस्पिटल, वर्कशॉप परिसर आणि शहरातील इतर महत्त्वाच्या मार्गांवर व चौकांमध्ये भटक्या जनावरांना आणि कुत्र्यांना सुरक्षेचे पट्टे बांधण्यात आले.

उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या असिस्टंट मॅनेजर सिंधू वासमवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला.

या उपक्रमाबद्दल बोलताना सिंधू वासमवार म्हणाल्या, अपघात टाळण्यासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न हजारो जीव वाचवू शकतो. आमचा उद्देश केवळ प्राण्यांना वाचवणे नव्हे, तर रस्ते सुरक्षा सुनिश्चित करणे हाही आहे.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या नांदेड युवा जिल्हाध्यक्षपदी विजयकुमार खटके

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक कार्यकर्ते, युवा नेतृत्व विजयकुमार खटके यांची नागपूर येथे संपन्न झालेल्या बैठकीत राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या नांदेड युवा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, या निवडीबद्दल अनेकांनी अभिनंदन केले आहे.



नागपूर येथील धनवंटे नॅशनल कॉलेज येथे २६ ऑगस्ट रोजी जातनिहाय जनगणनेत ओबीसीचा कॉलम ठेवावा यासाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशन दरम्यान राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ठिय्या आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या सर्व विंगच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच बैठक पार पडली.

**पान १ वरून...**

**राखीच्या धाग्याने बांधले...**

'सुरक्षित राहा, सुरक्षित वाहन चालवा, सुरक्षित घरी पोहोचा' असा अनमोल संदेश लिहिलेला होता. कागदावरील घोषणांपेक्षा हातावर बांधलेली ही राखी जास्त काळ मनात राहील, हा यामागचा उद्देश होता.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने पोलीस आणि नागरिकांमधील नाते हे केवळ कायद्याचे नसून भावनिक आणि विश्वासाचे आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. एका बाजूला सणाचा आनंद, तर दुसऱ्या बाजूला रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करून प्रत्येक नागरिकाला सुखरूप त्याच्या घरी पोहोचवण्याचा पोलिसांचा निर्धार या उपक्रमात दिसून आला.

हा अभिनव उपक्रम पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जसपालसिंग कोटतीर्थवाले, संतोष तिडके, अजय साखळे यांच्यासह आदी अधिकारी- अंमलदार, महिला कर्मचारी या सोबतच स्वयंसेवक ओझा, किरण कुमार यांनी यशस्वीपणे राबविला. नांदेडकरांनीही या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. अनेक वाहनधारकांनी जागीच वाहतूक नियम पाळण्याची शपथ घेतली. दंडाऐवजी मायेचा धागा बांधून शिस्त लावणाऱ्या वाहतूक पोलिसांच्या या अनोख्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# कॅप्टन आशिष दामले यांच्या हस्ते विद्यार्थ्याला ७५ हजारांची मदत

## प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांचा मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)–** परभणी येथे पार पडलेल्या ब्राह्मण समाज संवाद यात्रा बैठकीत गरजू विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करण्यात आला. बी.ई.च्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या हर्षल हेमंतराव आसेगावकर या विद्यार्थ्याला एकूण ७५ हजार रुपयांची शैक्षणिक मदत प्रदान करण्यात आली. ही मदत परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांच्या हस्ते देण्यात आली. ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू गुणवंत विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये यासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सर्व स्तरावर आर्थिक मदत करण्याचे आश्वासन कॅप्टन आशिष दामले यांनी दिले होते.



हर्षल आसेगावकर हा सध्या एमआयटी कॉलेज, आळंदी येथे बी.ई.च्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. त्याच्या पुढील शिक्षणासाठी आर्थिक अडचणी निर्माण झाल्याची बाब लक्षात आल्यानंतर अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी मदत मिळवून देण्यासाठी विशेष पुढाकार घेतला. सामाजिक बांधिलकी व समाज बांधवांच्या आर्थिक समस्यांची जाणीव असणारे कॅप्टन आशिष दामले यांनी मराठवाड्यातील अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत दिल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण पूर्ण होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने हर्षलला ५० हजार रुपयांची शैक्षणिक मदत मंजूर करण्यात आली. तसेच शंतनू सुभेदार यांनी वैयक्तिक स्तरावर २५ हजार रुपयांची मदत दिली. अशा प्रकारे विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी एकूण ७५ हजार रुपयांचा मदतनिधी उपलब्ध झाला.

ब्राह्मण समाज संवाद यात्रा बैठकीच्या व्यासपीठावर कॅप्टन आशिष दामले यांच्या हस्ते ही आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, या भूमिकेतून करण्यात आलेल्या या मदतीचे उपस्थितांनी स्वागत केले.

या मदतीसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, किरण सुभेदार यांनी पुढाकार घेतल्यामुळे हर्षल आसेगावकर व त्यांच्या कुटुंबियांनी त्यांचे आभार मानले.

# किनवटच्या पोलीस निरीक्षकांना सहआरोपी करून निलंबित न केल्यास आत्मदहन; पीडित महिलेचा इशारा

**किनवट (प्रतिनिधी)–** येथील पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी तक्रार दाखल करून न घेता अपमानास्पद वागणूक दिल्याचा आणि आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप एका पीडित महिलेने केला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक कराड यांना सहआरोपी करून निलंबित करण्यात यावे, अन्यथा दि. १ सप्टेंबर रोजी उपोषण आणि आत्मदहन करण्याचा इशारा पीडितेने जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

यासंदर्भात त्या महिलेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी तक्रार देण्यासाठी किनवट पोलीस ठाण्यात गेले होते. परंतु, पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी तक्रार न घेता अपमानास्पद वागणूक देऊन परत पाठविले.आपण विधवा, गरीब आणि आंध (आदिवासी) समाजाच्या असल्यामुळे योग्य तो न्याय दिला गेला नाही, असा आरोपही पीडितेने केला आहे.

तसेच तक्रार मागे घेण्यासाठी विविध माध्यमांतून दबाव टाकला जात असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या सर्व प्रकारामुळे आपल्या जिवाला धोका निर्माण झाला असून, सर्व संबंधितांचे मोबाईल सी.डी.आर. तपासण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांना तीन दिवसांच्या आत या प्रकरणात सहआरोपी करून निलंबित करण्यात यावे अन्यथा १ सप्टेंबर २०२६ रोजी सहायक जिल्हाधिकारी कार्यालय, किनवटसमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचे आणि २ सप्टेंबर २०२६ रोजी समाजबांधवांच्या उपस्थितीत आत्मदहन करणार असल्याचा गंभीर इशारा पीडितेने दिला आहे.

# जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालयात समाजकार्य पंधरवडा विविध कार्यक्रम

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाचे जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र नवीन नांदेड येथे दि. ९ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०२६ पर्यंत भारतीय संविधान : सामाजिक न्याय, समता, लोकशाही आणि मानवी प्रतिष्ठेचा पाया या थीमवर आधारित समाजकार्य पंधरवडा संस्थेचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब जाधव यांची प्रेरणा व उत्तम मार्गदर्शनातून पार पडला.




या पंधरवडा कार्यक्रमात महाविद्यालय परिसर स्वच्छता, वृक्षारोपण, आदिवासी व ग्रामीण भागातील समस्या, सामाजिक न्याय व समता स्थापनेत समाज कार्यकर्त्यांची भूमिका यावर गटचर्चा, अंधश्रद्धा निर्मूलन व सामाजिक समता सहप्रयोग व्याख्यानमाला, विद्यार्थ्यांमध्ये वाचण्याची अधिक आवड निर्माण व्हावी याकरिता वाचन प्रेरणा दिन व वाचनाचे महत्त्व यावर माहिती, भारतीय संविधान: सामाजिक न्याय, समता, लोकशाही आणि मानवी प्रतिष्ठा व्याख्यानमालेत नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. यदुपत अर्धापूरकर यांनी मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागात संविधान-विषयी अधिक जागरूकता निर्माण व्हावी याकरिता सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी क्षेत्र कार्याच्या माध्यमातून संविधान जागर कार्यक्रम घेण्यात आले. स्वातंत्र्य दिनानिमित्त सेल्फीसह हर घर तिरंगा अभियान, सामाजिक न्याय, समता स्थापनेत समाज कार्यकर्त्यांची भूमिका यावर निबंध स्पर्धेचे आयोजन, भारतीय संविधान व महिला सक्षमीकरण व्याख्यानमालेत डॉ. अशोक सिद्धेवाड यांचे व्याख्यान, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जल दिन व वॉकोथान स्पर्धेत महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा सहभाग, महाविद्यालय स्तरावर रांगोळी व पोस्टर्स स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा याचबरोबर वेगवेगळ्या सामाजिक उत्थानासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था यांना भेटी देऊन त्यांची सामाजिक समता निर्माण प्रक्रियेत काय भूमिका याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात भरभरून प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जी, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. मेघराज कपूर, डॉ. मनीषा मांजरमकर, डॉ. दिलीप काठोडे, डॉ. शेख ए. ए., डॉ. कर्डिले ए. एन., डॉ. रेड्डी व्ही.एस, डॉ. लोखंडे प्रतिभा, डॉ. शिंदे शिवाजी, डॉ. वरगंटे सत्वशीला, प्रा. सुनील गोईनवाड, प्रा. बडगिरे गोपाल, सुनील राठोड ग्रंथपाल, संतोष मोरे, राजेश्वर पाळेकर, सुनील कंधारकर, गणेश तेलंगे, मोहन स्वामी, राजू सुताडे, राजीव केंद्रे तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी यशस्वी सहयोग नोंदविला.

# मोहम्मद युनूस मशिदीतील आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



**नांदेड (प्रतिनिधी)–** ईद- ए-मिलादुन्नबीच्या पावन पर्वाच्या औचित्याने शहरातील रेल्वे स्थानक रस्त्यावर असलेल्या मोहम्मद युनूस मशीद येथे रक्तदान शिबिराचे आयोजन वसीम बाबू यांच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.

या शिबिरासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढी विभागाच्या डॉक्टरांची टीम संपूर्ण उपकरणांसह मशिदीत दाखल झाली होती. दुपारी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून हे शिबीर यशस्वी केले.

यावेळी मशिदीचे प्रमुख ॲड. मोहम्मद कासिम उर्फ वसीम बाबू व यांचे कुटुंबीय, त्यांचे मित्र परिवार तसेच समाजातील सर्व स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल शासकीय रक्तपेढीच्या वतीने मोहम्मद युनूस मशीद कमिटीचे मोहम्मद कासिम उर्फ वसीम बाबू सेठ तसेच हॅप्पी क्लबचे शोएब भाई यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## घराच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही अन् स्मार्ट लॉकचा खर्च किती?

### जाणून घ्या बसवण्यापासून देखभालीपर्यंतचे गणित

**आजच्या काळात घराची सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. सीसीटीव्ही कॅमेरे आणि स्मार्ट लॉक हे घराच्या सुरक्षेसाठी उपयुक्त ठरणारे दोन महत्त्वाचे पर्याय आहेत. मात्र, हे उपकरणे बसवण्यापूर्वी त्यांची किंमत, स्थापना, साठवणूक व्यवस्था आणि देखभालीचा खर्च समजून घेणे आवश्यक आहे. बाजारात साधारण १,५०० रुपयांपासून वाय-फाय कॅमेरे, तर विविध सुविधांनुसार २५ हजार रुपयांपर्यंत स्मार्ट लॉक उपलब्ध आहेत. त्यामुळे योग्य नियोजन केल्यास आपल्या गरजेनुसार आणि बजेटनुसार घराची सुरक्षा व्यवस्था उभारता येऊ शकते.**



### घरासाठी कोणते सीसीटीव्ही योग्य?

सीसीटीव्ही बसवण्यापूर्वी घराचा आकार आणि किती भागावर लक्ष ठेवायचे आहे, हे निश्चित करणे महत्त्वाचे आहे. घर लहान असेल आणि एक-दोन कॅमेऱ्यांची गरज असेल, तर स्वतंत्र वाय-फाय कॅमेरे हा सोपा पर्याय ठरू शकतो. अशा कॅमेऱ्यांची किंमत साधारण १,५०० ते ३,५०० रुपये प्रति कॅमेरा असू शकते. या कॅमेऱ्यांमध्ये ३६० अंश फिरण्याची क्षमता, दोन्ही बाजूंनी आवाज ऐकण्याची आणि बोलण्याची सुविधा तसेच हालचालींचा मागोवा घेण्यासारखी वैशिष्ट्ये उपलब्ध असू शकतात. मोठ्या घरासाठी चार ते आठ कॅमेऱ्यांची आवश्यकता असल्यास डीव्हीआर किंवा एनव्हीआर आधारित वायर्ड सीसीटीव्ही प्रणाली अधिक योग्य ठरू शकते. चार कॅमेऱ्यांच्या अशा संचाची किंमत साधारण १२ हजार ते २५ हजार रुपये असू शकते. यात कॅमेरे, रेकॉर्डर आणि वीजपुरवठ्याची साधने समाविष्ट असू शकतात.

### सीसीटीव्ही बसवण्याचा खर्च किती?

सीसीटीव्हीची किंमत ही एकूण खर्चाचा फक्त एक भाग आहे. त्यासोबत रेकॉर्डिंगसाठी आवश्यक संचयन व्यवस्था, वायरिंग आणि बसवण्याचा खर्चही विचारात घ्यावा लागतो. वाय-फाय कॅमेऱ्यांसाठी साधारण ६४ जीबी किंवा १२८ जीबी मायक्रोएसडी कार्ड वापरले जाऊ शकते. त्याची किंमत साधारण ५०० ते १,००० रुपये असू शकते. संचयन क्षमतेनुसार काही दिवसांचे रेकॉर्डिंग जतन करता येते आणि त्यानंतर जुन्या नोंदी हटत जाऊन नवीन नोंदी साठवल्या जातात. वायर्ड सीसीटीव्ही प्रणालीसाठी साधारण १ टीबी ते २ टीबी क्षमतेची विशेष निगराणी हार्डडिस्क आवश्यक असू शकते. तिची किंमत साधारण ३,५०० ते ५,५०० रुपये असू शकते. याशिवाय कॅमेरे बसवणे, वायरिंग करणे आणि तंत्रज्ञाचे शुल्क यासाठी साधारण ५०० ते १,००० रुपये किंवा त्यापेक्षा अधिक खर्च होऊ शकतो. प्रत्यक्ष खर्च घराची रचना आणि स्थापनेच्या कामाच्या प्रमाणावर अवलंबून बदलतो. दोन वाय-फाय कॅमेरे, संचयन आणि स्थापनेसह एकूण खर्च साधारण ९,००० ते १५,००० रुपये होऊ शकतो. चार कॅमेऱ्यांची संपूर्ण वायर्ड सीसीटीव्ही प्रणाली उभारण्यासाठी साधारण २५,००० ते ४५,००० रुपये खर्च येऊ शकतो.

### स्मार्ट लॉकसाठी किती खर्च येतो?

सीसीटीव्हीसोबत स्मार्ट लॉक बसवल्यास घराच्या प्रवेशद्वाराच्या सुरक्षेत आणखी भर पडू शकते. मात्र, स्मार्ट लॉकची किंमत त्यातील सुविधांनुसार मोठ्या प्रमाणात बदलते. साध्या सुविधांसह स्मार्ट लॉकची किंमत साधारण ४,००० ते ८,००० रुपये असू शकते. मोबाइल ॲपच्या माध्यमातून दरवाजा उघडणे किंवा पाहुण्यांसाठी एकदाच वापरता येणारा संकेतांक तयार करणे यांसारख्या सुविधा हव्या असतील, तर वाय-फाय स्मार्ट लॉकची किंमत साधारण ८,००० ते १५,००० रुपये असू शकते. तर अंगभूत व्हिडिओ कॅमेरा, दरवाजाची घंटी आणि त्रिमितीय चेहरा ओळखण्याची सुविधा असलेल्या प्रीमियम स्मार्ट लॉकसाठी १५,००० ते ३०,००० रुपये किंवा त्याहून अधिक खर्च येऊ शकतो.

### स्मार्ट लॉक बसवण्याचा खर्च

स्मार्ट लॉक खरेदी केल्यानंतर ते दरवाजावर योग्य पद्धतीने बसवण्यासाठी अतिरिक्त खर्च होऊ शकतो. लाकडी दरवाजावर स्मार्ट लॉक बसवताना दरवाजामध्ये आवश्यक बदल करण्यासाठी सुताराकडून साधारण १,००० ते २,००० रुपये आकारले जाऊ शकतात. धातूच्या दरवाजासाठी कापणे, वेल्डिंग किंवा इतर आवश्यक कामे करावी लागल्यास खर्च २,५०० रुपये किंवा त्यापेक्षा अधिक होऊ शकतो.

### देखभालीचा खर्चही लक्षात घ्या...

स्मार्ट लॉकच्या देखभालीमध्ये सर्वात महत्त्वाचा खर्च बॅटरीचा असतो. काही स्मार्ट लॉकमध्ये चार किंवा आठ एए आकाराच्या अल्कलाइन बॅटऱ्या वापरल्या जातात. वापर आणि मॉडेलनुसार या बॅटऱ्या साधारण ८ ते १२ महिने चालू शकतात. त्यामुळे वर्षभरात बॅटरी बदलण्यासाठी साधारण २०० ते ४०० रुपये खर्च होऊ शकतो. याशिवाय लॉकमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास दुरुस्ती किंवा सेवा शुल्काचा अतिरिक्त खर्च लागू शकतो.

### घराच्या सुरक्षेचे योग्य नियोजन करा

घरासाठी सुरक्षा व्यवस्था उभारताना केवळ महागडी उपकरणे खरेदी करण्यापेक्षा आपल्या गरजेनुसार योग्य उपकरणांची निवड करणे महत्त्वाचे आहे. लहान घरासाठी एक-दोन वाय-फाय कॅमेरे आणि मूलभूत स्मार्ट लॉक पुरेसे ठरू शकते. मोठ्या घरासाठी मात्र अनेक कॅमेरे, रेकॉर्डिंगसाठी पुरेशी संचयन क्षमता आणि अधिक सक्षम प्रवेश नियंत्रण प्रणालीची आवश्यकता असू शकते. सीसीटीव्ही आणि स्मार्ट लॉक हे घराच्या सुरक्षेला पूरक तंत्रज्ञान आहे. योग्य ठिकाणी कॅमेरे बसवणे, मजबूत पासवर्ड वापरणे, उपकरणांचे सॉफ्टवेअर अद्ययावत ठेवणे आणि वेळोवेळी त्यांची कार्यक्षमता तपासणे तितकेच महत्त्वाचे आहे. योग्य नियोजन केल्यास अनावश्यक खर्च टाळून घराची सुरक्षा अधिक सक्षम करता येते.

## नव्या घरासाठी कॉपर की ॲल्युमिनियम?

### सुरक्षित आणि भविष्यासाठी सक्षम वायरिंग कशी निवडाल?

**नवे घर बांधताना मजबूत बांधकाम, आकर्षक इंटिरिअर, दर्जेदार रंगरंगोटी याकडे आपण आवर्जून लक्ष देतो. मात्र, भिंतींच्या आतून जाणाऱ्या विद्युत वायरिंगकडे अनेकदा दुर्लक्ष होते. प्रत्यक्षात घरातील विद्युत व्यवस्था ही घराच्या सुरक्षिततेबरोबरच महागडी उपकरणे आणि स्मार्ट गॅजेट्सच्या सुरक्षेसाठीही अत्यंत महत्त्वाची असते. घराला भविष्यातील तंत्रज्ञानासाठी सक्षम आणि सुरक्षित ठेवायचे असेल, तर वायरिंगसाठी योग्य प्रकारची तार निवडणे आवश्यक आहे. कॉपर आणि ॲल्युमिनियम या दोन पर्यायांपैकी घरगुती वापरासाठी कॉपरची तार अधिक योग्य मानली जाते.**



### कॉपर की ॲल्युमिनियम?

कॉपरची विद्युतवाहकता ॲल्युमिनियमपेक्षा अधिक असल्याने विद्युतप्रवाह वाहून नेण्याची तिची क्षमता चांगली असते. त्यामुळे तुलनेने कमी उष्णता निर्माण होऊन अधिक विद्युतभार हाताळणे शक्य होते. ॲल्युमिनियमची तार मात्र वजनाने हलकी आणि तुलनेने स्वस्त असते. त्यामुळे मोठ्या व्यावसायिक प्रकल्पांमध्ये किंवा मुख्य विद्युतवाहिन्यांमध्ये तिचा वापर केला जातो. मात्र तापमानातील बदलांमुळे ॲल्युमिनियम आकुंचन-पसरण पावू शकते. परिणामी जोडणी सैल होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत विद्युत बिघाड किंवा शॉर्टसर्किटचा धोका वाढू शकतो. त्यामुळे घरातील अंतर्गत वायरिंगसाठी सुरक्षेच्या दृष्टीने दर्जेदार कॉपर वायरला प्राधान्य देणे योग्य ठरते.

### वायरिंगचा खर्च कशावर अवलंबून असतो?

कॉपर आणि ॲल्युमिनियमच्या किमती त्यांच्या बाजारभावानुसार बदलतात. त्याशिवाय वायरची गुणवत्ता, जाडी, इन्सुलेशनचा दर्जा आणि सुरक्षा मानकांचे पालन यामुळेही किंमत बदलते. पाइप किंवा कंड्युटमधून वायरिंग केल्यास साहित्याबरोबरच मजुरीचा खर्चही वाढतो. मात्र भविष्यात दुरुस्ती, देखभाल किंवा वायर बदलण्याची गरज भासल्यास कंड्युट प्रणाली अधिक सोयीची ठरू शकते.

### विद्युत तार म्हणजे नेमके काय?

विद्युत तारेचे मुख्यतः दोन भाग असतात. पहिला म्हणजे धातूचा चालक, ज्यातून विद्युतप्रवाह एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातो. दुसरा म्हणजे या चालकावर असलेले इन्सुलेशन, जे विद्युतप्रवाहाचा थेट संपर्क होऊ न देता विजेचा धक्का आणि इतर धोके टाळण्यास मदत करते. तारेची जाडी साधारणपणे गेज किंवा संबंधित आकारमानानुसार निश्चित केली जाते. जाड तार अधिक विद्युतभार सहन करू शकते, तर तुलनेने पातळ तार कमी भार असलेल्या उपकरणांसाठी वापरली जाते.

### कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात?

घरातील प्रत्येक उपकरणासाठी एकाच जाडीची तार वापरणे योग्य नाही. विद्युतभारानुसार योग्य आकाराची तार निवडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः एसी, गीझर, ओव्हन, वॉशिंग मशीन यांसारख्या जास्त विद्युतभार घेणाऱ्या उपकरणांसाठी योग्य क्षमतेची स्वतंत्र वायरिंग करणे आवश्यक आहे. चुकीच्या आकाराची किंवा कमी क्षमतेची तार वापरल्यास ती गरम होऊन ओव्हरहिटिंगचा धोका निर्माण होऊ शकतो. तसेच वायरिंग करताना योग्य दर्जाचे इन्सुलेशन, अर्थिंग आणि संरक्षणात्मक उपकरणांचा वापर करणे गरजेचे आहे.

### वायरिंगचे विविध प्रकार

घराच्या रचनेनुसार आणि वापराच्या ठिकाणानुसार वायरिंगची पद्धत निवडली जाते. अनेक ठिकाणी प्लास्टिक इन्सुलेशन असलेल्या केबल्सचा वापर केला जातो. बाहेरील किंवा ओलसर भागांसाठी विशेष संरक्षणात्मक इन्सुलेशन असलेल्या केबल्सची आवश्यकता असू शकते. व्यावसायिक किंवा अधिक कठीण वातावरणातील बांधकामांमध्ये धातूचे संरक्षणात्मक आवरण असलेल्या केबल्सचाही वापर केला जातो. मात्र कोणती वायर किंवा केबल वापरायची, हे घराची रचना, विद्युतभार आणि स्थानिक विद्युत सुरक्षा नियम लक्षात घेऊन तज्ज्ञ इलेक्ट्रिशियन किंवा अभियंत्याच्या सल्ल्याने ठरवणे अधिक सुरक्षित आहे.

### ‘फ्युचर-प्रूफ’ घरासाठी हेही करा

घराची वायरिंग करताना फक्त आजच्या गरजा लक्षात न घेता भविष्यातील विद्युत उपकरणांचा विचार करा. स्मार्ट होम उपकरणे, अतिरिक्त एसी, इलेक्ट्रिक वाहनांचे चार्जिंग किंवा इतर जास्त विद्युतभार घेणारी उपकरणे भविष्यात वापरली जाण्याची शक्यता असल्यास त्यानुसार विद्युत आराखडा तयार करणे उपयुक्त ठरते. मेन स्विचबोर्ड आणि MCB वर स्पष्ट लेबल लावणे, घराचा विद्युत आराखडा तयार करून जतन करणे आणि वेळोवेळी वायरिंग व जोडण्यांची तपासणी करणे आवश्यक आहे. सैल झालेले, खराब झालेले किंवा गंजलेले कनेक्शन आढळल्यास ते तातडीने दुरुस्त करावे. थोडक्यात, नव्या घरासाठी केवळ स्वस्त वायरिंग करण्यापेक्षा सुरक्षित, दर्जेदार आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन वायरिंग करणे अधिक महत्त्वाचे आहे. घरगुती अंतर्गत वायरिंगसाठी योग्य क्षमतेची दर्जेदार कॉपर वायर, सक्षम अर्थिंग, योग्य संरक्षणात्मक उपकरणे आणि नियोजनबद्ध विद्युत आराखडा हे सुरक्षित घराचे महत्त्वाचे घटक आहेत.



## वाय-फाय एसी घेणे शहाणपणाचे की अनावश्यक खर्च?

**आजच्या काळात घरातील अनेक उपकरणे स्मार्ट होत आहेत. स्मार्ट दिवे, सुरक्षा कॅमेरे, टीव्ही यांसोबतच आता वातानुकूलित यंत्रणांमध्येही वाय-फाय आणि स्मार्ट नियंत्रणाची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे एसी खरेदी करताना साधा एसी घ्यावा की वाय-फाय सुविधा असलेला स्मार्ट एसी, असा प्रश्न अनेकांना पडतो. स्मार्ट एसीची किंमत साध्या एसीपेक्षा काही हजार रुपयांनी अधिक असते. त्यामुळे हा अतिरिक्त खर्च आवश्यक आहे की केवळ हौस, असा प्रश्न निर्माण होतो. मात्र, एसीचा वापर, घरातील सुविधा आणि भविष्यातील गरजा लक्षात घेतल्यास वाय-फाय एसी काहींसाठी उपयुक्त ठरू शकतो.**

### जाणून घ्या फायदे, वैशिष्ट्ये अन् किंमतीतील फरक




### वाय-फाय एसी म्हणजे काय?

वाय-फाय एसी हा मूलभूत कार्यक्षमतेच्या दृष्टीने सामान्य एसीसारखाच असतो. मात्र, त्याला इंटरनेटशी जोडता येत असल्याने मोबाइलमधील संबंधित ॲपद्वारे तो नियंत्रित करता येतो. काही वाय-फाय एसीमध्ये ॲमेझॉन अलेक्सा, गुगल होम आणि ॲपल होमकिट यांसारख्या स्मार्ट प्रणालींचे समर्थन असते. त्यामुळे स्मार्ट स्पीकरच्या माध्यमातूनही एसी नियंत्रित करता येतो. या सुविधेमुळे घराबाहेर असतानाही मोबाइलच्या माध्यमातून एसी सुरू किंवा बंद करणे, तापमान बदलणे किंवा त्याच्या वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होते.

### वाय-फाय एसीमुळे वीजबिल कमी होऊ शकते का?

वाय-फाय एसीचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे त्यातील वेळापत्रक निश्चित करण्याची सुविधा. उदाहरणार्थ, आपण कार्यालयात असताना एसी तुलनेने जास्त तापमानावर सुरू ठेवू शकता आणि घरी पोहोचण्याच्या काही वेळ आधी तापमान कमी करण्यासाठी तो सेट करू शकता. खोली पूर्णपणे तापल्यानंतर ती थंड करण्यासाठी एसीला तुलनेने अधिक ऊर्जा लागू शकते. त्यामुळे नियोजनबद्ध वापर केल्यास अचानक वाढणारा विद्युतभार आणि वीजेचा वापर काही प्रमाणात कमी करण्यास मदत होऊ शकते. याशिवाय, रात्री एसी ठराविक वेळी बंद होईल आणि सकाळी पुन्हा सुरू होईल, असे वेळापत्रकही निश्चित करता येते. त्यामुळे एसी अनावश्यकपणे संपूर्ण रात्र सुरू ठेवण्याची गरज राहत नाही. मात्र, वाय-फाय सुविधा आहे म्हणून आपोआप वीजबिल कमी होईलच असे नाही. ऊर्जा बचत प्रामुख्याने एसीची ऊर्जा कार्यक्षमता, तापमानाची योग्य सेटिंग, खोलीची स्थिती आणि वापरण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते.

### तुमच्यासाठी कोणता एसी योग्य?

स्मार्ट घरासाठी वाय-फाय एसी : नवे घर बांधत असाल आणि घरातील उपकरणे स्मार्ट पद्धतीने नियंत्रित करण्याची इच्छा असेल, तसेच बजेटमध्ये काही हजार रुपयांची वाढ करणे शक्य असेल, तर वाय-फाय एसीचा विचार करता येईल. विशेषतः घराबाहेर असताना एसी नियंत्रित करणे, वेळापत्रक निश्चित करणे आणि मोबाइलवरून त्याचे व्यवस्थापन करणे यांसारख्या सुविधा नियमित वापरणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरू शकतात.



### साध्या आणि वाय-फाय एसीच्या किमतीत किती फरक?

उदाहरणार्थ, १.५ टन क्षमतेचा ३-स्टार साधा एसी साधारण ३२ हजार ते ३८ हजार रुपयांपर्यंत मिळू शकतो. त्याच क्षमतेच्या वाय-फाय आणि ॲप-नियंत्रित एसीची किंमत साधारण ३४ हजार ते ४० हजार रुपयांपर्यंत असू शकते. त्याचप्रमाणे, २ टन क्षमतेचा ३-स्टार साधा एसी साधारण ४४ हजार ते ५२ हजार रुपयांपर्यंत, तर वाय-फाय सुविधा असलेला एसी ४६ हजार ते ५५ हजार रुपयांपर्यंत असू शकतो. म्हणजेच, मॉडेलनुसार साध्या आणि वाय-फाय एसीमध्ये साधारण ३ हजार ते ७ हजार रुपयांचा फरक पडू शकतो. प्रत्यक्ष किंमत कंपनी, मॉडेल, ऊर्जा कार्यक्षमता, विक्रेता आणि उपलब्ध सवलतीनुसार बदलू शकते.

### बजेट कमी असेल तर साधा एसी

तुमचे बजेट मर्यादित असेल किंवा मोबाइलद्वारे एसी नियंत्रित करण्यासारख्या सुविधांची विशेष गरज नसेल, तर साधा एसी घेणे अधिक व्यवहार्य ठरू शकते. केवळ वाय-फाय सुविधेसाठी अतिरिक्त पैसे खर्च करण्याची आवश्यकता नाही.

### प्रत्येक खोलीसाठी नाही गरज

घरातील सर्वच खोल्यांसाठी महागडे स्मार्ट एसी घेणे आवश्यक नाही. ज्या खोलीत एसीचा वापर कमी होतो, तिथे साधा एसी बसवता येतो. ज्या खोलीत एसीचा नियमित वापर होतो आणि स्मार्ट नियंत्रणाची गरज आहे, तिथे वाय-फाय एसीचा पर्याय निवडता येतो.



# दिल्लीनंतर आता कांद्याची 'चेन्नई एक्सप्रेस'; मनमाडमध्ये मोठ्या ट्रकमधून रेल्वेत भरला ८०० टन कांदा

**नाशिक (प्रतिनिधी)** – देशभरात साखरेनंतर कांद्याचे भावही अचानक वाढल्याने सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने नाफेडच्या माध्यमातून कांदा खरेदीचा निर्णय घेतला आहे. त्याच पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याच्या लासलगाव येथून पहिली कांदा एक्सप्रेस दिल्लीला पोहोचली आहे. आता, लासलगाव पाठोपाठ मनमाड येथूनही कांदा एक्सप्रेस धावणार असून ८०० टन कांदा घेऊन 'कांदा एक्सप्रेस' चेन्नईला जाणार आहे. मनमाड रेल्वे स्थानकात २१ बोगीमध्ये कांदा भरण्याचे काम सुरू असून संध्याकाळपर्यंत कांदा एक्सप्रेस चेन्नईसाठी रवाना होईल. यामध्ये, हलक्या प्रतीचा व खराब कांदा लोड होत असल्याचं पाहायला मिळत आहे.

कांद्याच्या भावात वाढ होताच केंद्र सरकारने कांद्याचे भाव नियंत्रणात आणण्यासाठी नाफेड व एनसीसीएफच्या माध्यमातून खरेदी करण्यात आलेला बफर स्टॉक कांदा नाशिक जिल्ह्यातून देशात पाठविण्याचे नियोजन करण्यात आले. दोन दिवसांपूर्वी नाशिकच्या लासलगाव रेल्वे स्थानकातून एक ४५० मेट्रिक टन कांदा घेऊन 'कांदा एक्सप्रेस' दिल्लीच्या दिशेने रवाना झाल्यानंतर आज पुन्हा मनमाड रेल्वे स्थानकातूनही एक कांदा एक्सप्रेस चेन्नईला पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी मनमाडच्या रेल्वेच्या मालधक्क्यातून कांदा भरण्याचे काम सुरू आहे. नाशिक जिल्ह्यातील विविध शहरात नाफेड व एनसीसीएफने साठवून ठेवलेल्या गोदामातून हा कांदा ट्रकमधून आणला जात आहे. सुमारे २१ डब्यांच्या रेल्वेमधून ८०० मेट्रिक टन कांदा संध्याकाळपर्यंत चेन्नईच्या दिशेने रवाना होणार आहे. त्यामुळे कांद्याच्या दरात घसरण होण्याची शक्यता निर्माण झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये काहीशी नाराजी पसरली आहे. शेतकऱ्यांच्या आरोपानंतरही आजही पाठवण्यात येणाऱ्या बफर स्टॉकमधील काहीसा खराब व हलक्या प्रतीचा कांदा 'कांदा एक्सप्रेस' मध्ये लोड केला जातोय. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी दिल्लीला कांदा एक्सप्रेस रवाना होत असताना, प्रहारच्या तालुका अध्यक्षांकडून कांदा एक्सप्रेस अडवण्यात आली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिक जिल्ह्यात दाखल झाले असून मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. दिंडोरी तालुक्यातील चाचडगावमध्ये विद्या प्रसारक संस्थेच्या वतीने कृषी महाविद्यालय उभारले आहे. या कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन होत आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलीस प्रशासनाकडून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या कांदा प्रश्नावर आवाज उठवणारे प्रहार संघटनेचे गणेश निंबाळकर यांना त्यांच्या चांदवड येथील राहत्या घरी स्थानबद्ध करण्यात आले. तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख शिवा सुराशे यांना सुरक्षेच्या कारणास्तव लासलगाव पोलीस ठाण्यात स्थानबद्ध केल्याची माहिती आहे.

# नवी दिल्लीत पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या दाम्पत्याला अटक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंधित हेरगिरी नेटवर्कविरोधात दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात एका दाम्पत्याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मोहम्मद साहिल आणि त्याची पत्नी समीरा हे २०२४ पासून सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानी गुप्तचर एजंटांच्या संपर्कात होते आणि या नेटवर्कसाठी काम करत होते.



दिल्ली पोलिसांनी या कारवाईला 'ऑपरेशन समीरा' असे नाव दिले आहे. तपासादरम्यान दाम्पत्याने २०२४ आणि २०२५ या कालावधीत ८ भारतीय सिमकार्ड मिळवून ती दुबईमार्गे पाकिस्तानला पाठवल्याचे समोर आल्याचा पोलिसांचा दावा आहे. या सिमकार्डचा वापर पाकिस्तानमध्ये व्हॉटसएप्प अकाउंट चालवण्यासाठी, भारतीय नागरिकांशी संपर्क साधण्यासाठी आणि संवेदनशील माहिती मिळवण्यासाठी करण्यात आल्याचा संशय आहे. याच्या मोबदल्यात दोघांना सुमारे ३० हजार रुपये देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या नॉर्दर्न रेंजला यापूर्वीच दिल्ली-एनसीआरमध्ये काही व्यक्ती दहशतवादी संघटनांना कथित लॉजिस्टिक मदत करत असल्याची माहिती मिळाली होती. याच तपासादरम्यान दिल्ली-एनसीआरमध्ये आयएसआय समर्थित नेटवर्क सक्रिय असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तपासानुसार, साहिल २०२४ मध्ये इंस्टाग्रामच्या माध्यमातून एका पाकिस्तानी एजंटच्या संपर्कात आला. त्यानंतर त्याची मैत्रीण समीरा हिचाही या संपर्कात सहभाग झाला. पुढे हा संपर्क एका कथित पाकिस्तानी इंटेलिजन्स ऑपरेटिव्ह (पीआयओ) पर्यंत पोहोचला. या व्यक्तीने दोघांना कथित नेटवर्कसाठी काम करण्यास प्रवृत्त केल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्याबदल्यात आर्थिक मोबदल्याचे आमिष दाखवण्यात आल्याचेही तपासात समोर आले आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, साहिल आणि समीरा यांनी २०२४-२५ या कालावधीत एकूण ८ भारतीय सिमकार्ड मिळवले आणि ती दुबईमार्गे पाकिस्तानला पाठवली. या सिमकार्डवर पाकिस्तानातून व्हॉटसऍप्प अकाउंट चालवण्यात आले आणि भारतीय नागरिकांशी संपर्क साधून महत्त्वाची माहिती मिळवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा पोलिसांना संशय आहे.या क्रमांकांच्या माध्यमातून काही भारतीय व्हॉटसएप्प ग्रुपमध्येही प्रवेश करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या संपूर्ण नेटवर्कचा उद्देश माहिती गोळा करून ती पाकिस्तानातील हँडलर्सपर्यंत पोहोचवणे होता का, याचा तपास सुरू आहे.

कॅंटोन्मेंट परिसराची रेकी; सैन्याची माहिती गोळा केली या तपासात आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, साहिलला कॅंटोन्मेंट परिसरांची रेकी करण्याचे तसेच नेटवर्कसाठी इतर व्यक्तींना जोडण्याचे काम देण्यात आले होते.साहिलने ज्या लष्करी जवानांविरोधात कोर्ट मार्शलची कारवाई सुरू होती, त्यांच्याशी संबंधित माहितीही कथितरित्या शेअर केल्याचा पोलिसांचा आरोप आहे.

# भारत अमेरिकेकडून 'जॅव्हेलिन' क्षेपणास्त्र खरेदी करणार, शत्रूचे रणगाडे क्षणात नष्ट करणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारत आपली सुरक्षा यंत्रणा सातत्याने आणखी मजबूत करण्यासाठी प्रयत्न करत असतो. यासाठी भारताकडून वेगवेगळे निर्णय घेतले जातात. आता भारत अमेरिकेकडून 'जॅव्हेलिन' अँटी-टँक क्षेपणास्त्र खरेदी करण्याच्या तयारीत आहे. भारतीय लष्कराने अमेरिकेच्या फॉरेन मिलिटरी सेल्सच्या प्रक्रियेद्वारे जॅव्हेलिन हे अँटी-टँक गाईडेड क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करण्यासाठी लेटर ऑफ ऑफर अँड क्सेप्टन्सवर स्वाक्षरी केल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिकेच्या मते या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संरक्षण सहकार्य अधिक दृढ होण्यास मोठी मदत होईल. हे क्षेपणास्त्र भारतीय सैन्यासाठी गेमचेंजर ठरण्याची शक्यता आहे.



यावर भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ गोर यांनी प्रतिक्रिया देत दोन्ही देशांच्या द्विपक्षीय संबंधांमधील हे मोठं पाऊल असल्याचं म्हटलं आहे.

जॅव्हेलिन ही युद्धात आपली क्षमता सिद्ध केलेली 'अँटी-टँक' (रणगाडा-विरोधी) प्रणाली भारत खरेदी करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे भारत-अमेरिका संरक्षण संबंधांमधील हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. यामुळे संयुक्त उत्पादनाच्या शक्यता देखील निर्माण झाल्या आहेत. तसेच दोन्ही देशांमधील सहकार्य आणखी मजबूत आणि सर्वोत्तम झाले आहे, अशी प्रतिक्रिया अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिओ गोर यांनी दिली आहे.

जेव्हलिन अँटी-टँक गाईडेड मिसाइल (एटीजीएम) खांद्यावरून मारा करणारे रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र आहे. हे एक पोर्टेबल रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र आहे, जे टाक्या, चिलखती वाहने आणि बंकर नष्ट करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. भारताला देण्यात येणाऱ्या या क्षेपणास्त्रांचं मूल्य अंदाजे ४५.७ दशलक्ष डॉलर्स आहे आणि त्यात क्षेपणास्त्रे तसेच प्रक्षेपण युनिट्सचा समावेश आहे. यात FGM-१४८ क्षेपणास्त्रे, २५ जेव्हलिन लाइटवेट कमांड लॉन्च युनिट्स आदींचा समावेश आहे.

# पूरग्रस्त नेपाळसाठी भारताची 'एअर रिलीफ'; वायुसेनेने पोहोचवली ४७.५ टन मदत

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – नेपाळमध्ये हिमनदीचा मोठा भाग तुटल्याने आलेल्या विनाशकारी पुरामुळे झालेल्या हानीचा सामना करण्यासाठी भारतीय वायुसेना मदत आणि बचाव कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आपत्तीच्या काही तासांतच वायुसेनेने सी-१३०जे विमानाद्वारे १० टन आवश्यक मदत सामग्री नेपाळमध्ये पोहोचवली. यामध्ये औषधे, तात्पुरते निवारे, ब्लँकेट आणि हायजीन किट्सचा समावेश होता. दुसरी खेप घेऊन वायुसेनेच्या सी-१७ ग्लोबमास्टर विमानाने ३७.५ टन अतिरिक्त मदत सामग्री (अन्न पाकिटे आणि आवश्यक औषधे) घेऊन काठमांडूसाठी उड्डाण केले. भारताने आतापर्यंत एकूण ४७.५ टन मदत सामग्री नेपाळला पाठवली आहे.




नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे मदत कार्यासाठी वायुसेनेने आपल्या ट्रान्सपोर्ट विमानांचा ताफा स्टँडबायवर ठेवला आहे. यामध्ये सी-१७, सी-१३०जे आणि सी-२९५ विमानांचा समावेश आहे. एक सी-१३०जे ट्रान्सपोर्ट विमान आज उशिरापर्यंत मदत सामग्री घेऊन नेपाळसाठी उड्डाण करणार आहे. वायुसेनेची एमआय-१७ हेलिकॉप्टरही नेपाळी नागरिकांच्या मदतीसाठी चोवीस तास उड्डाण करत आहेत. मदत सामग्री घेऊन नेपाळला जाणाऱ्या विमानांचे संचालन वायुसेनेच्या हिंडन स्टेशनवरून केले जात आहे.

आम्ही अशा आपत्कालीन परिस्थितीसाठी नेहमीच तयार असतो. त्यामुळे आम्ही तातडीने एक सी-१३०जे हरक्युलिस विमान तयार केले. त्यामध्ये आम्ही मदत सामग्री, औषधे आणि जनरेटर लोड केले. हे काम नागरी अधिकाऱ्यांच्या आणि एनडीआरएफच्या मदतीने पूर्ण करून ऑपरेशन सुरू करण्यात आले. विमानाने रात्री सुमारे ८.३० वाजता उड्डाण केले आणि दोन तासांच्या आत नेपाळमध्ये उतरून सुमारे १० टन सामग्री पोहोचवली. याच दुसऱ्या फ्लाइटमध्ये सी-१७ विमानातून पुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या नेपाळसाठी ३७.५ टन मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण सामग्री, औषधे आणि खाद्यपदार्थांची पाकिटे पोहोचवण्यात आली, असे वायुसेनेच्या हिंडन स्टेशनचे एओसी एअर कमोडोर आर. डोभाल यांनी सांगितले. वायुसेना भारताच्या आत तसेच नेपाळ, म्यानमार आणि श्रीलंका यांसारख्या शेजारी देशांमध्ये अनेकदा मदतकार्य करते. नुकतेच व्हेनेझुएलामध्येही एक ऑपरेशन करण्यात आले होते. जगात कुठेही गरज भासल्यास मदत करण्यासाठी वायुसेना सज्ज आहे. नेपाळमध्ये आणखी मदतीची गरज भासल्यास आम्ही पूर्णपणे तयार आहोत. नेपाळमध्ये २०१५ मध्ये झालेल्या भूकंपाच्या वेळी वायुसेनेचे सी-१३० विमान मदत पथक आणि डॉक्टरांसह सर्वप्रथम खराब झालेल्या धावपट्टीवर उतरले होते. त्यावेळी वायुसेनेने २२०० हून अधिक उड्डाणे केली होती, असेही ते म्हणाले.

# हिमालयात लपलेत २४३१ 'धोक्याची सरोवरे'; फुटली तर येऊ शकतो महापूर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – हिमालयातील हिमनद्या वेगाने मागे सरकत असताना त्यातून निर्माण होणाऱ्या हिमनदीय सरोवरांच्या वाढत्या आकारामुळे भविष्यातील पुरांचा धोका वाढत असल्याचे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या उपग्रह अभ्यासातून समोर आले आहे. १९८४ ते २०२३ या कालावधीतील उपग्रह प्रतिमांच्या अभ्यासानुसार, २०१६-१७मध्ये ओळखल्या गेलेल्या १० हेक्टरपेक्षा मोठ्या २,४३१ हिमनदीय सरोवरांपैकी ६७६ सरोवरांचा आकार लक्षणीयरीत्या वाढला आहे. यातील ६०१ सरोवरांचा आकार दुपटीपेक्षा अधिक वाढला, तर १० सरोवरांचा आकार दीड ते दोन पट आणि ६५ सरोवरांचा आकार सुमारे दीड पट वाढल्याचं खडठजने नमूद केलं आहे. वाढलेल्या ६७६ सरोवरांपैकी १३० सरोवरे भारतात आहेत. यातील ६५ सिंधू, ७ गंगा आणि ५८ ब्रह्मपुत्रा नदीखोऱ्यात आहेत.

हिमनदीच्या वितळण्यामुळे तयार झालेल्या सरोवरांना नैसर्गिक बंधारे असतात. हे बंधारे बर्फ, माती, दगड किंवा हिमनदीने मागे सोडलेल्या मोरेनपासून तयार झालेले असू शकतात. भूस्खलन, हिमस्खलन, अतिवृष्टी किंवा इतर कारणांमुळे हे नैसर्गिक बंधारे तुटल्यास सरोवरातील मोठ्या प्रमाणातील पाणी अचानक खाली



येऊ शकतं. याला Glacial Lake Outburst Flood म्हणजेच GLOF म्हटलं जातं. अशा पुराचा वेग आणि त्यासोबत वाहून येणारा गाळ, दगड-माती यामुळे नदीखोऱ्यातील पायाभूत सुविधा आणि वस्तीला मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

याचा धक्कादायक अनुभव ऑक्टोबर २०२३मध्ये सिक्कीमला आला. उत्तर सिक्कीममधील South Lhonak Lake फुटल्यानंतर तीस्ता नदीच्या खोऱ्यात मोठ्या प्रमाणात पूर आला. ISROच्या उपग्रह निरीक्षणानुसार, २८ सप्टेंबर २०२३ रोजी या सरोवराचं क्षेत्रफळ सुमारे १६७.४ हेक्टर होतं. ४ ऑक्टोबरला ऋइजऋंतर ते सुमारे ६०.३ हेक्टर राहिलं. म्हणजे जवळपास १०५ हेक्टर क्षेत्रातील पाणी बाहेर पडलं, ज्यामुळे downstream भागात अचानक पूर निर्माण होण्यास हातभार लागला. या घटनेनंतर हिमालयातील इतर हिमनदीय सरोवरांकडेही अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

मात्र येथे एक महत्त्वाची गोष्ट समजून घेणं आवश्यक आहे. २,४३१ सरोवरे म्हणजे २,४३१ संभाव्य 'टाइम बॉम्ब' आहेत, असा अर्थ नाही. ISROच्या अभ्यासात या सरोवरांचा आकार आणि त्यातील बदल नोंदवण्यात आला आहे; प्रत्येक सरोवराला तातडीने GLOFचा धोका आहे, असा निष्कर्ष काढलेला नाही. धोका निश्चित करण्यासाठी सरोवराचा आकार, पाण्याची वाढ, नैसर्गिक बंधाऱ्याची रचना, परिसरातील भूस्खलन किंवा हिमस्खलनाची शक्यता आणि खालील भागातील लोकवस्ती यांसारख्या अनेक घटकांचा अभ्यास करावा लागतो. ISROच्या अभ्यासात वाढलेल्या ६७६ सरोवरांपैकी ३०७ मोरेन-डॅम्ड, २६५ erosion-related, 8 ice-dammed आणि ९६ इतर प्रकारची असल्याचं समोर आलं आहे. त्यापैकी ३१४ सरोवरे ४,००० ते ५,००० मीटर उंचीवर, तर २९६ सरोवरे ५,००० मीटरपेक्षा जास्त उंचीवर आहेत.

# मराठी शिकायला मुदतवाढ मिळाल्यानंतर मराठी माणूस चिडेल अशा पद्धतीचं रिक्षा चालकांचं सेलिब्रेशन

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रिक्षाचालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ दिल्याच्या आनंदात गोरेगाव पूर्व आरे कॉलनीत रिक्षा युनियनकडून जोरदार सेलिब्रेशन करण्यात आलं.

या सेलिब्रेशन दरम्यान मराठी भाषा शिकण्याच्या मुदतवाढीचा आनंद साजरा करताना मुलीला भोजपुरी गाण्यावर नाचवण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

या सेलिब्रेशन दरम्यान मराठी भाषा शिकण्याच्या मुदतवाढीचा आनंद साजरा करताना मुलीला भोजपुरी गाण्यावर नाचवण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे.

ढोल-डीजेच्या तालावर गुलाल उधळून हा जल्लोष करण्यात आला, मात्र मराठीच्या मुद्यावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर भोजपुरी गाण्यावर डान्सचा हा व्हिडीओ आता चर्चेचा आणि वादाचा विषय ठरू शकतो.

ढोल-डीजेच्या तालावर गुलाल उधळून हा जल्लोष करण्यात आला, मात्र मराठीच्या मुद्यावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर भोजपुरी गाण्यावर डान्सचा हा व्हिडीओ आता चर्चेचा आणि वादाचा विषय ठरू शकतो.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्तीची केली होती. जुजबी, कामापुरती मराठी भाषा बोलता आलीच पाहिजे असं त्यांचं म्हणणं होतं. पण मुख्यमंत्री फडणवीस यांनी आता मुदतवाढ दिली आहे.


## Change In Name

**My Old Name is Sangmitra Hiraman Pandit which now I am changing as New Name: Sanghmitra Hiraman Pandit Hence forth, my all correspondence will be done as per my New Name please consider, the same.**

**- Address- Bhaiyya saheb Ambedkar Nagar waghi road Vazirabad, Nanded Pin : 431601**


# मुंबईकरांना महागाईचा फटका! सुट्या दुधाच्या दरात ९ रुपयांची वाढ; १ सप्टेंबरपासून नवे दर लागू

**मुंबई (प्रतिनिधी)** – सणासुदीच्या तोंडावर मुंबईकरांच्या घरगुती बजेटवर महागाईचा मोठा फटका बसणार आहे. मुंबई दुग्ध उत्पादक संघाने सुट्या म्हशीच्या दुधाच्या घाऊक दरात प्रतिलिटर ९ रुपयांची मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे १ सप्टेंबर २०२६ पासून मुंबईत सुट्या दुधाचा घाऊक दर ९३ रुपयांवरून थेट १०२ रुपये प्रतिलिटर होणार आहे. हे नवे दर २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत पुढील सहा महिन्यांसाठी लागू राहतील. त्यानंतर पुन्हा एकदा याचा आढावा घेण्यात येणार आहे.

हे घाऊक दर असल्याने किरकोळ बाजारात ग्राहकांना स्थानिक विक्रेते आणि वाहतूक खर्चानुसार दुधासाठी अतिरिक्त मोजावे लागण्याची शक्यता आहे. सुट्या म्हशीच्या दुधाचा सध्याचा घाऊक दर : ९३ रुपये प्रतिलिटर. फेब्रुवारी २०२६ मध्ये हा दर ९१ रुपयांवरून ९३ रुपये झाला होता. १ सप्टेंबर २०२६ पासून नवीन घाऊक दर : १०२ रुपये प्रतिलिटर (९ रुपयांची थेट वाढ). अंमलबजावणी कालावधी : १ सप्टेंबर २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२७ (त्यानंतर दराचा पुन्हा आढावा घेतला जाईल). पॅकेटबंद दुधाच्या दरांवर या वाढीचा थेट परिणाम होणार नाही. अमूल किंवा मदर डेअरी यांसारख्या कंपन्या आपापल्या उत्पादन खर्चानुसार किरकोळ दर ठरवतील.

पशुखाद्याच्या दरात २५ टक्के वाढ : दाणा, तूरचुणी, चणाचुणी, चारा आणि पेंड यांच्या किमतीत सुमारे २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. जनावरांच्या किमतीत वाढ : दुधाळ जनावरांच्या खरेदीच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. शुद्ध दुधाची वाढती मागणी : अन्न व



औषध प्रशासनाकडून भेसळयुक्त दुधाविरोधात कडक कारवाई सुरू झाल्यानंतर बाजारात खऱ्या आणि शुद्ध दुधाची मागणी वाढली आहे. सप्टेंबर महिन्यापासून गणेशोत्सव, नवरात्र आणि दिवाळी यांसारखे मोठे सण सुरू होत आहेत. या काळात दूध, दही, खवा, तूप आणि मिठाईची मागणी प्रचंड वाढते. त्यामुळे या दरवाढीचा थेट परिणाम सणांच्या बजेटवर होणार आहे.

# 'एनटीए'मध्ये केंद्राच्या तीन अधिकाऱ्यांची नियुक्ती

## २ संचालक, एक सहसंचालक; तीन आठवड्यांत पदभार स्वीकारण्याचे आदेश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – केंद्र सरकारने नॅशनल टेस्टिंग एजन्सीमध्ये दोन संचालक आणि एक सहसंचालक नियुक्त केले आहेत. हे आदेश २७ ऑगस्ट रोजी जारी करण्यात आले होते.

आयपीएस रवी कुमार सिंग आणि आयएएस अधिकारी प्रसन्ना व्यंकटेश व्ही यांना संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. २०१६ च्या बॅचचे आयआरएस अधिकारी (सीमाशुल्क आणि अप्रत्यक्ष कर) अमित सामदारिया यांना छढ मध्ये सहसंचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तीन आठवड्यांत पदभार स्वीकारावा लागेल. तिन्ही आदेशांमध्ये कार्मिक मंत्रालयाच्या त्या परिपत्रकाचा संदर्भ देण्यात आला आहे, ज्यामध्ये नियुक्त अधिकाऱ्यांना आदेश जारी झाल्यापासून तीन आठवड्यांच्या आत नवीन जबाबदारी स्वीकारण्यास सांगितले आहे.

आदेशात म्हटले आहे की, असे न केल्यास सेंट्रल स्टाफिंग स्कीममधून वगळण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. अलीकडेच सरकारने छढच्या परीक्षा पद्धतीत मोठ्या प्रमाणावर बदलांची घोषणा केली होती. यात पेपर तपासणीसाठी चार-स्तरीय प्रक्रिया लागू करणे समाविष्ट आहे. सरकारने ६०० तज्ज्ञांना काढून टाकण्याची आणि विषय तज्ज्ञांना समाविष्ट करण्याचीही घोषणा केली आहे. याव्यतिरिक्त, परीक्षा पद्धतीत अनेक इतर बदलही केले जातील.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितास या जाहीर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री रौफ खान पि. गुलाब खान, वय 50 वर्ष, धंदा व्यापार, रा.मंढई, इतवारा, नांदेड ता.जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येते की,

माझे पक्षकार यांनी खरेदीखता आधारे श्री जबीउल्लाखान पि.गुलाब बेग, रा.देगलूर नाका, नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका हद्दीतील सर्वे नं. 131 पैकी इस्लामपुरा मधील एक प्लॉट ज्याचा प्लॉट क्र. 149 चा उत्तरेकडील भाग ज्याची एकूण लांबी पूर्व पश्चिम 40 फुट म्हणजे 12.19 मी. आहे व रुंदी दक्षिण उत्तर 15 फुट म्हणजे 4.57 मीटर आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ 600 चौ.फुट म्हणजे 55.76 चौ.मी. आहे. ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | प्लॉट क्र. 152 आहे |
| पश्चिमेस | :- | 20 फुट रुंद रोड आहे |
| दक्षिणेस | :- | सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग आहे |
| उत्तरेस | :- | प्लॉट क्र. 148 आहे |

वरील वर्णनाचे प्लॉट नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. 7212/2010 दि. 26.07.2010 या प्रमाणे सदरील प्लॉट माझ्या पक्षकाराने खरेदी केलेला आहे.

सदरील प्लॉटची लिंक रजिस्ट्री ही जबीउल्लाखान पि.गुलाब बेग यांच्या नांवे असलेली मुळ लिंक रजिस्ट्री ज्याचा नोंदणीकृत विक्रीखत क्र. 2548/2010 दिनांक 06.03.2010 ह्या लिंक रजिस्ट्रीची मुळ प्रत दिनांक 27.08.2026 रोजी माझे पक्षकार मंढई ते बर्की चौक जात असताना गहाळ झाली आहे. त्याबाबत माझ्या पक्षकाराने सदरील लिंक रजिस्ट्रीची मुळ प्रत मिळावी म्हणुन खुप शोधा शोध केली असतांना सुध्दा ती सापडुन आली नाही म्हणून त्यांनी या बाबत मा.पोलीस निरीक्षक कार्यालय, पोलीस ठाणे, इतवारा येथे फिर्याद दिली असता ठाणे प्रभारी यांनी त्यांच्या ठाणे दैनंदिनीमध्ये अनुक्रमांक 018 प्रमाणे नोंद केली आहे. सदरील लिंक रजिस्ट्रीच्या मुळ प्रतीची माझ्या पक्षकाराला शुभम हाऊसिंग फायनान्स कंपनी भावसार चौक नांदेड कडून गृहकर्ज घेण्यासाठी नितांत आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, माझ्या पक्षकाराची गहाळ झालेली वरील लिंक रजिस्ट्रीची मुळ प्रत कोणास सापडल्यास सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर आणुन द्यावी किंवा संपर्क करावा त्यांना योग्य तो मोबदला देण्यात येईल.

करिता जाहीर प्रगटन.

दिनांक : 27.08.2026

मार्फत,
ॲड.एच.बी. नरंगले,
नांदेड

जाहीर प्रगटन देणार,
श्री रौफ खान पि. गुलाब खान,
रा.मंढई, इतवारा, नांदेड ता.जि. नांदेड



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८





## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार यांनी दिलेल्यां माहीती व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **निळकंठ रामराव कळसे रा. सिडको ता. जि. नांदेड** यांच्याकडुन त्यांच्या मालकी व ताब्यातील **मौ. खुपसरवाडी** ता. जि. नांदेड हद्दीतील गट कं. 83 मधील प्लॉट नं. 61 ज्याची साईज एकुण लांबी पुर्व पश्चिम 13 मी. व रूंदी दक्षिण उत्तर 11 मी. आहे ज्याचे एकुण क्षेत्रफळ 143 चौ. मी. आहे ज्याची चतु:सिमा **पुर्वेस** : 9 मी. रूंद रोड आहे. **पश्चिमेस** : प्लॉट कं. 60 आहे. **दक्षिणेस** : 6.00 मी. रूंद रोड आहे. **उत्तरेस** : प्लॉट कं. 62 आहे. येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील प्लॉट माझे पक्षकार यांनी जलतरू पाषाणासह कायमस्वरूपी विकत घेण्याचा करार केला आहे व करारपोटी बयाना रक्कमही दिलेली आहे.

तरी सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, सदर वरील नमुद प्लॉट बाबत कोणाचे काही मालकी हक्कसंबंध, सौदा, गहाण, कर्जबोजा, वारस, न्यायालयीन वाद, मुखत्यारआम इत्यादी काही आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्व झाल्यापासुन 08 दिवसाच्या आत संबंधीत मुळ कागदपत्रासह खालील पत्यावर संपर्क साधावा. मुदतीत आक्षेप किंवा उजर न आल्यास माझे पक्षकार सदरील प्लॉटचे विक्रीखत करून घेतील व मुदतीनंतर आलेला कोणताही आक्षेप किंवा उजर हे माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

करिता हे जाहीर प्रगटन

प्रगटन देणार
ॲड. व नोटरी रामदास पी. शेरे
विमानतळ रोड, नालंदानगर, नांदेड
मो.नं. 9822915069

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ७७६७७७१७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




'समान काम, समान वेतना'साठी

# राज्यातील ३४ हजार कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा

## न्यायालयीन कर्मचारी उपसणार संपाचे हत्यार



**नांदेड (प्रतिनिधी)** – उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना 'समान काम, समान वेतन' मागणीसाठी राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी १६ सप्टेंबरपासून संप पुकारणार आहेत. मुंबई येथे १६ ऑगस्ट रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आली.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी गठित केलेल्या न्यायमुर्तींच्या विशेष समितीने ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनास न्यायालयीन कर्मचा-यांच्या सुधारित वेतनश्रेणीबाबतचा गोपनीय अहवाल सादर केला असतांनाही मागील दोन वर्षांपासून दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव रखडल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून 'न्यायाघरीच अन्याय' होत असल्याने असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत न्यायालयीन कर्तव्य बजावणाऱ्या दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनातील असमानतेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. उच्च न्यायालयाप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुध्दा 'समान कामासाठी, समान वेतन' मिळणे हा न्याय्य आणि मूलभूत हक्क असून, हा हक्क डावलला जाऊ नये, असा ठाम निर्धार राज्यातील वर्ग-३, लघुलेखक, बेलिफ आणि चतुर्थश्रेणी न्यायालयीन कर्मचारी महासंघाने मागील दोन वर्षापासून लावून धरला आहे. परंतु शासनाच्या उदासीन धोरणामुळे न्यायालयीन कर्मचारी त्यांच्या वेतनवाढीच्या न्याय हक्कापासून वंचित आहेत.

याकरिता न्यायालयीन महासंघ १६ सप्टेंबर रोजी एक दिवसीय काळ्या फिती लावून निषेध आंदोलन करणार आहे. त्यानंतरही मागणी मान्य न झाल्यास १६ आणि १७ ऑक्टोबर असे दोन दिवस पुन्हा काळ्या फिती लावून शासनाचा निषेध नोंदवण्यात येणार आहे. तरीही मागण्या पूर्ण न झाल्यास ५ नोव्हेंबर रोजी राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचारी एक दिवसीय सामूहिक रजेवर जाणार आहेत. जर त्यानंतर देखील मागण्या मंजूर न झाल्यास आंदोलनाचे शेवटचे हत्यार म्हणून राज्यातील सर्व ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी हे १७ नोव्हेंबर पासून बेमुदत संप पुकारतील असा निर्वाणीचा इशारा महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आला आहे. विशेष म्हणजे या संपास बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ंड गोवाचे सदस्य सतीश देशमुख यांच्यासह सर्वपक्षीय आमदार खासदार तसेच सर्वच स्तरातुन वाढता पाठिंबा मिळत आहे.

# सिडको येथे अण्णाभाऊ साठे पुर्णाकृती पुतळायाचे आ.बोढारकर यांच्या हस्ते लोकार्पण

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – अण्णाभाऊ साठे स्मारक सभागृह साठी पंधरा लक्ष रूपये निधी हा सुशोभीकरण करण्यासाठी जाहीर केला व वेळोवेळी सम ाजबांधव यांच्या मागण्या स्मारक विकसीत करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आ.आनंदराव पाटील बोढारकर यांनी सांगितले.

२८ ऑगस्ट रोजी अण्णा भाऊ साठे स्मारक सिडको येथे पुर्णाकृती अण्णा भाऊ साठे लोकार्पण सोहळा माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे, युवा सेना जिल्हा प्रमुख बाळु पाटील भाजपा नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, राजु लांडगे,सतिश बसवदे,सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे,विनायक आकुरके, सुदीन पाटील बागल, साहेबराव मामीलवाड,दलीत मित्र आर.जे. वाघमारे,माधव अंबटवार,नारायण कौलंबीकर, छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार प्राप्त जनार्दन गुपीले, विठ्ठल घाटे, मरीबा बसवंते, शंकर धिरडीकर,आनंदा गायकवाड, ऊतम घोडेकर, सुरेश कांबळे,शेषराव कांबळे यांच्या सह समाजातील जेष्ठ बांधव युवक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सार्वजनिक जयंती महोत्सव सिडको यांच्या वतीने अध्यक्ष अंकुश गायकवाड व पदाधिकारी यांनी सिडको येथील अण्णाभाऊ साठे स्मारक येथे अण्णा भाऊ साठे पुर्णाकृती पुतळा स्मारक परिसरात स्थापना केली याम ुळे समाज बांधवात आनंद झाला या पुर्णाकृती पुतळा अनावरण सोहळा आ.आनंद पाटील बोढारकर व माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे, सिडको प्रभागातील नगरसेवक व मान्यवरांच्या यांच्यासह समाजबांधव यांच्या उपस्थितीत २८ ऑगस्ट रोजी लोकार्पण सोहळा



फटाक्यांची आतिषबाजी व ढोलताशांच्या गजरात करण्यात आले.

प्रारंभी सिडको अण्णाभाऊ साठे स्मारक सभागृहात अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला, यावेळी प्रास्ताविक चंद्रकांत मेकाले, सुत्रसंचलन दिगांबर शिंदे यांनी तर सार्वजनिक जयंती मंडळ अध्यक्ष अंकुश गायकवाड यांनी मार्गदर्शन पर भाषण करून अण्णा भाऊ साठे सभागृह सुशोभीकरण करण्यासाठी निधी मागणी केली तर भाजपाचे नगरसेवक वैजनाथ देशमुख व नगरसेविका प्रतिनिधी राजु लांडगे यांनी सुशोभीकरण करण्यासाठी निधी देण्याचे मागणी केली. हा सोहळा यशस्वीतेसाठी अध्यक्ष अंकुश गायकवाड, स्वागत अध्यक्ष रमेश तालीमकर, कार्याध्यक्ष रंगनाथ गजले,पप्पू गायकवाड, नितीन वाघमारे साईनाथ भोसले,चंदु कांबळे, दशरथ कंधारे,माधव गवाले, साहेबराव डाकोरे, संभाजी कांबळे व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

खासदार आष्टीकर यांच्या आदेशाची विद्युत वितरण कंपनीने घेतली दखल

# बरडशेवाळा आरोग्य केंद्रातील विद्युत प्रश्न कायमचा सुटला



**नांदेड(प्रतिनिधी)**–नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या हदगाव तालुक्यातील बरडशेवाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला माजी आमदार म ाधवराव पाटील जवळगावकर यांनी विविध योजनांतून निधी उपलब्ध करून दिला होता. सोलार पॅनलसह अनेक विकासकामे पूर्ण झाल्याने या आरोग्य केंद्राचा कायापालट झाला आहे.

सध्या या आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी मुख्यालयाम ध्ये राहून सेवा देत आहेत. अनेक पदे रिक्त असूनही सर्व कर्मचारी समन्वयाने काम करत असल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, आरोग्य केंद्रासम ोरील ३३ के.व्ही. उपकेंद्रातील विद्युत तारा आणि लंच केबल निकामी झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून विजेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. यामुळे दैनंदिन कामकाजावर व रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होत होता. ही बाब लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्त्या सविता निमडगे पळसेकर यांनी तालुका व जिल्हा प्रशासनासह खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्याकडे रिक्त पदे भरणे व विजेची सम स्या सोडवण्याबाबत सातत्याने पाठपुरावा केला.

खासदार आष्टीकर यांनी या प्रश्नाची दखल घेत संबंधित विभागाला तात्काळ आदेश दिले. त्यानुसार भोकर-हदगाव विभागाच्या मार्गदर्शनाखाली मनाठा येथील कनिष्ठ अभियंता प्रदीप नरनावरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने काम पूर्ण करत आरोग्य केंद्रासाठी स्वतंत्र फिडरद्वारे विद्युत पुरवठा सुरू केला.

हे काम पूर्ण करण्यासाठी वीज कर्मचारी वनराज पवार, शरद राठोड आणि संदीप जमदाडे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्युत पुरवठा सुरळीत झाल्यामुळे आता आरोग्य सेवा अधिक सक्षमपणे देण्यास मदत होणार आहे. हा प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवल्याबद्दल आरोग्य केंद्रातील अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

आत्महत्याग्रस्त ३५ मराठा कुटुंबांना न्याय कधी मिळणार?

# नांदेडमधील ९ कुटुंबांच्या अर्जदारांना नियम-अटींच्या नावाखाली डावलल्याचा श्याम पाटील वडजे यांचा आरोप

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठा आरक्षणाच्या चळवळीत आत्महत्या केलेल्या युवकांच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देऊन त्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याचा शब्द राज्य सरकारने दिला होता. त्यानुसार शासनाने शासन निर्णय देखील जारी केला. मात्र, या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याऐवजी नांदेड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील अर्जदारांना अनुकंपा तत्त्वावरील नियम व अटींच्या कचाट्यात अडकवून नोकरीपासून वंचित ठेवल आहे, असा आरोप नांदेड जिल्हा मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांनी केला आहे.

जोपर्यंत नांदेड जिल्ह्यातील ३५ पैकी ३५



आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या घरात शासकीय नोकरीचे आदेश जाऊन पडत नाहीत तोपर्यंत या व्यवस्थेला शांत झोपू देणार नाही, असा खरमरीत इशाराही वडजे यांनी दिला.

मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनात नांदेड जिल्ह्याने सातत्याने आघाडीची भूमिका बजावली. आरक्षणाच्या मागणीसाठी जिल्ह्यातील समाजबांधवांनी रस्त्यावर उतरून मोठा संघर्ष केला. मागील काही वर्षांच्या आंदोलनाच्या काळात नांदेड जिल्हा राज्यातील अग्रगण्य जिल्हा म्हणून पुढे आला. मात्र, या आंदोलनाच्या काळात भावनिक होऊन आणि आरक्षणाच्या लढ्यात आपले सर्वस्व पणाला लावत नांदेड जिल्ह्यातील तब्बल ३५ युवकांनी आत्महत्या केल्या, असा दावा करण्यात आला.

आरक्षणाच्या लढ्यात जीव गमावलेल्या या युवकांच्या कुटुंबियांना आधार देण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारने जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून शासकीय नोकरी देण्याचा निर्णय घेतला. शासनाने त्यासाठी शासन अध्यादेशही जारी केला. मात्र, अध्यादेश जारी होऊनही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याने आत्महत्याग्रस्त कुटुंबियांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

नांदेड जिल्ह्यातील काही प्रकरणांमध्ये राज्य परिवहन महामंडळात जागा उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करण्यात आले, तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अद्याप एकाही पात्र व्यक्तीला नियुक्ती देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मागण्यांचे निवेदन आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या उपस्थितीत निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यामार्फत राज्य शासनाला सादर करण्यात आले आहे.

# मोफत कराटे व वुशू प्रशिक्षणास रक्षाबंधन दिवशी मुलींचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड व सक्षम बहुउद्देशीय सेवाभावी सोसायटी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा वुशू संघटनेच्या सहकार्याने स्वातंत्र्य दिनापासून शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत कराटे व वुशूचे प्रशिक्षण शिबीर सुरु आहे. रक्षाबंधन या मुलींच्या आवडत्या सणाच्या दिवशी देखील मुलींचा उत्स्फुर्त सहभाग दिसून आला. या शिबीरात जवळपास दीडशे शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला, त्यात



मुलींची संख्या लक्षणीय आहे.

शिबीर यशस्वीतेसाठी राष्ट्रीय प्रशिक्षक तथा राज्य पंच डॉ. प्रमोद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतीक्षा भगत, मधु असोले, यशिका बोरीकर, राहुल हिंगोले, जयकांत एडके, संदेश यशवंते, राहुल गायकवाड आदी प्रशिक्षक परिश्रम घेत आहेत.

या शिबिराच्या यशस्वी वाटचालीबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, जिल्हा वुशू संघटनेचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य व सचिव डॉ. राजेश जांभळे आदींनी शुभेच्छा दिल्या.

## हाजी मोहम्मद उस्मान अहमदभाई लुलानिया यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील प्रसिद्ध उस्मान मेडिकल व्यापारी हाजी मोहम्मद उस्मान अहमदभाई लुलानिया यांचे निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या साईनगर चाँद मस्जिद येथील निवासस्थानावरून शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता निघेल व त्यांचे अंतिम संस्कार (दफन विधी) बडी दरगाह गाडीपुरा येथील स्मशानभूमीत करण्यात येणार आहेत.



## शांताबाई भातलवंडे लव्हेकर यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)** –शहरातील ज्येष्ठ महिला शांताबाई लक्ष्मीकांतराव भातलवंडे यांचे वृद्धापकाळाने शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी दुपारी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७६ वर्षे होते.



त्यांच्या पश्चात पोलीस उपअधीक्षक गजानन भातलवंडे, विमा अधिकारी पांडुरंग भातलवंडे, वेतन पथक जिल्हा अधीक्षक मनोज भातलवंडे ही तीन मुलगे, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. लातूर-उदगीर येथील डीवायएसपी गजानन भातलवंडे यांच्या त्या मातोश्री होत.

# खुनाच्या प्रयत्नासह तीन ठिकाणी घरफोड्या, ६ लाखांचा मुद्देमाल लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात गुरुवारी दिवसभरात खुनाचा प्रयत्न आणि तीन ठिकाणी घरफोडीच्या घटना घडल्या असून, चोरट्यांनी सुमारे ६ लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलीस अधिक तपास करीत आहेत.

माहूर तालुक्यातील शेकापूर येथे ग्रामसभेत प्रश्न विचारल्याच्या कारणावरून एकावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास, शेकापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे आरोपी सुनिल नामदेवराव बेहेर (वय ५५), रामेश्वर रेणुकादास चव्हाण (वय ४५), गणेश नामदेव राठोड (वय ५०) आणि विवेक गणेश राठोड (वय २२) सर्व रा. शेकापूर यांनी संगनमत करून फिर्यादीचा भाऊ समाधान कांबळे याने ग्रामसभेत विविध कामांबाबत प्रश्न विचारल्याच्या रागातून शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी फिर्यादी महेश अशोकराव कांबळे (वय २६, रा. शेकापूर) यांच्या फिर्यादीवरून माहूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १६०/२०२६, कलम १०९(१), ११५(२), ३५२, ३५१(१), ३(५) BNS-२०२३ सह कलम ३(१)(r), ३(१)(s), ३(२)(va) अॅट्रॉसिटी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे हे करीत आहेत.

शहरातील सिडको परिसरात असलेल्या नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. २६ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते दि. २७ ऑगस्ट पहाटे ५ वाजेच्या दरम्यान, हडको, नांदेड येथील फिर्यादी राजेश्वर पुरुषोत्तम रेवनवाड (वय ४४) यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १०५५/२०२६, कलम ३३१(४), ३०५ BNS अन्वये गुन्हा दाखल असून तपास हवालदार माने करीत आहेत.

हदगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. २६ ऑगस्ट रात्री १०.३० ते दि. २७ ऑगस्ट सकाळी १०.३० वाजेच्या दरम्यान, वाळकी (बु.) येथील कयादू बार रेस्टॉरंटमध्ये मागील दरवाजाने प्रवेश करून अज्ञात चोरट्याने बारमधील विदेशी दारू, रोख रक्कम आणि सीसीटीव्हीचा DVR असा एकूण ३ लाख ८७ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी शिवाजी सखाराम जिंतूरकर (वय ३५, रा. वाळकी बु.) यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. २५३/२०२६, कलम ३३१(४), ३०५(र) BNS अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० ते दि. २७ ऑगस्ट सकाळी ७ वाजेच्या दरम्यान, मिलिंदनगर, नांदेड येथील फिर्यादी विश्रांतीबाई कचरू जोंधळे यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटातील सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

## रुक्मिनबाई म्यानेवार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील कौठा भागातील रहिवासी श्रीमती रुक्मिनबाई गंगाधर म्यानेवार यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता राहत्या घरी निधन झाले. त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा, २ सुना, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी सकाळी राहत्या घरुन निघून सकाळी १० वाजता शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असे धर्माजी गुरुपवार यांनी कळविले आहे.



## चेन्नापुरात मीटर फोडून विजेची चोरी; दोघांविरुद्ध पोलीस कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – अर्धापूर तालुक्यातील मौजे चेन्नापूर येथे दोन वीज ग्राहकांनी विजेचे मीटर फोडून वीज चोरी केल्याचे महावितरणच्या तपासणीत आढळून आले. याप्रकरणी देण्यात आलेल्या तक्रारीनुसार नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२५ ऑगस्ट रोजी सहायक अभियंता संतोष सोनकांबळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चेन्नापूर येथील रहिवाशी सीताबाई संभाजी तहाडे यांनी विजेचे मीटर फोडून १०१३५ रुपये व व्यंकटी बालाजी बोरकर यांनी ८६०८ रुपयांची वीज चोरी केली. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा १३५ नुसार दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com